# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यात "प्रधानमंत्री आवास" योजनेबाबत**

**(१) ४४९१७ (३०-११-०००२). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यात "प्रधानमंत्री आवास" योजनेअंतर्गत सन २०१२ पर्यंत सर्वांना परवडणारी एकूण २२ लाख घरे बांधण्यात येणार असून माहे एप्रिल, २०१५ ते मार्च, २०१७ पर्यंत पहिल्या टप्प्यात शंभर शहरांमध्ये व शेवटच्या टप्प्यात माहे एप्रिल, २०१९ ते मार्च, २०२१ पर्यंत आणखी दोनशे शहरांमध्ये ही योजना राबविण्यात येणार असल्याचे डिसेंबर, २०१५ मध्य वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या महत्वाकांक्षी योजनेच्या अंमलबजावणीसाठी शहरांची निवड करणे, जागांची तरतूद करणे, विकासकांची यादी करणे, प्लान आखणी मंजुरी याबाबत शासनाने काही उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१०-१०-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.
सद्य:स्थितीत राज्यातील ३८२ शहरांमध्ये प्रधानमंत्री आवास योजना राबविण्यात येत आहे. तसेच सन २०२२ पर्यंत १९.४० लक्ष घरकुलांची निर्मिती करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.
(२) व (३) सदर योजना राज्यात राबविण्यासाठी शासनाने दि.९ डिसेंबर,२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. योजनेंतर्गत शहरांची निवड केंद्र शासनामार्फत करण्यात येते. योजनेंतर्गत घरांच्या निर्मितीसाठी संबंधित अंमलबजावणी यंत्रणांना रु.१ चौ.मी. नाममात्र दराने शासकीय जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

तसेच प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांना वाटप करण्यात येणाऱ्या ३० चौ.मी. पर्यंतच्या क्षेत्राच्या सदनिकांच्या वाटपाच्या संबंधातील केवळ पहिल्या दस्त्याला मुद्रांक शुल्कात सवलत देण्यात येऊन ते रु.१ हजार इतके निश्चित करण्याबाबत आले असून आर्थिकदष्ट्या दुर्बल घटकाकरीता बांधण्यात येणाऱ्या गृहप्रकल्पास संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी नियमानुसार मान्यता दिल्यानंतर अशा सर्व प्रकरणामध्ये मोजणी फी मध्ये प्रचलित मोजणी फी च्या ५०% सवलत देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबईतील वाहतुकीवरील ताण कमी करण्यासाठी कोस्टल रोड तयार करणेबाबत**

**(२) ६५४३३ (०७-०२-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, जेएनपीटी बंदराचा विस्तार, नैना क्षेत्र यामुळे भविष्यात दळणवळणाचा उदभवणारा प्रश्न यासाठी वाशी-ठाणे व पामबीच मार्गाला समांतर असा वाशी ते बेलापूर अशा दोन सागरी किनारी मार्गासंबधीचे प्रस्ताव नवी मुंबई महानगरपालिकेने एमएमआरडीकडे सादर केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त दोन मार्गापैकी पहिल्या टप्प्यातील वाशी ते ऐरोली दरम्यानच्या कोस्टल रोडला एमएमआरडीए ने मान्यता दर्शवली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या मार्गाचे काम अद्यापी सुरु करण्यात आले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, वाशी-ठाणे व पामबीच या पहिल्या मार्गाचे तसेच वाशी ते बेलापूर या दुसऱ्या मार्गाचे काम सुरु करण्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) • वाशी ते ठाणे या पहिल्या टप्प्याचे १६.९ कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या प्रस्ताव एम.सी. झेड. एम. ए. यांचेकडे ना-हरकत परवानगी मागितली होती. त्याअनुषंगाने त्यांनी काही अटीवर परवानगी देण्याचे मान्य केले आहे.
• सदर कामाचे डि. पी. आर. बनविला असून हे काम प्रादेशिक स्वरूपाचे असल्याने सदरचा प्रस्ताव एम.एम.आर.डी.ए. कडे पाठविला आहे.
• दुसऱ्या टप्प्यातील वाशी ते बेलापूर या कामाची व्यवहार्यता (Feasiability) तपासणे आवश्यक आहे.

• सदरचा रस्ता आठ पदरी बनविण्याकरीता रू. ५०३८ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. याबाबत एम.एम. आर. डी. ए. कडे प्रस्ताव सादर केला असून एम.एम.आर.डी.ए.ने अद्यापपर्यंत लेखी कळविलेले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उल्हासनगर (जि.ठाणे) येथील पाणी पुरवठा योजनेबाबत

**(३) ८८६२१ (२३-०८-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील सुमोर ३०० कोटी रूपयांची पाणी पुरवठा योजना पूर्ण होऊनही नागरिकांच्या उपयोगी आली नसून या योजनेचे वर्क आडिटसुद्धा संशायस्पद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पाणीपुरवठा योजना उल्हासनगरवासीयांना पाणी पुरवठा करण्यास अपयशी ठरली असून येथील जनतेचे पाण्यासाठी हाल होत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१८) :** (१), (२), (३) व (४) • उल्हासनगर शहरासाठी सन २००८ मध्ये केंद्र शासन सहाय्यित “जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनर्निर्माण अभियान” अंतर्गत रु.१२७.६५ कोटी रुपयांची पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली आहे.
• सदर योजना प्रगतीपथावर असतांना या योजनेअंतर्गत समाविष्ट नसलेल्या काही भागाकरीता योजना सुधारीत करुन महापालिकेच्या स्वयंनिधीतुन निधी उभारुन रु.२५६.५४ कोटी रुपयांची कामे पुर्ण करण्यात आली आहेत.
• सदर योजनेच्या अनुषंगाने प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सदर प्रकल्पाची मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, कोकण यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून, सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने पुढील निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

## उल्हासनगर (जि.ठाणे) येथील नगरचनाकार पद रिक्त असल्याबाबत

**(४) ८८७५८ (२३-०८-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील नगरचनाकार श्री.करपे बेपत्ता झाल्यानंतर गत एक वर्षापासून नगरचनाकार पद रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पनवेलचे श्री.देव यांची येथे बदली केली असली तरी त्यांनी ही येथील पदभार स्विकारण्यास उदासिनता दर्शविली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उल्हासनगर प्रारूप विकास आराखडा प्रक्रिया प्रगतीपथावर असतांना नगररचनाकार पद रिक्त असल्याने अनेक अडचणी निर्माण होऊ शकतात याची कल्पना महानगरपालिकेने शासनास दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रिक्त नगरचनाकार पदी सक्षम अधिका-यांची नियुक्ती करण्याबाबत शासनास्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-१०-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) होय.

उल्हासनगर महानगरपालिकेतील नगररचनाकार या शासकीय आस्थापनेच्या पदावर कार्यरत असलेले श्री.सं.ना.करपे हे दि.२०/८/२०१६ पासून बेपत्ता झाल्यामुळे सदरहू पद रिक्त होते. नगररचना संचालनालयाच्या दि.०६/०४/२०१७ रोजीच्या आदेशान्वये श्री.श्री.वि.देव, नगर रचनाकार यांची उल्हासनगर महानगरपालिका येथे बदली करण्यात आली. तथापि, ते सदर पदावर रुजू न झाल्याने त्यांची भूसावळ नगर परिषद येथे व श्री.मि.म.सोनावणी, नगर रचनाकार यांची नगर रचनाकार, उल्हासनगर महानगरपालिका या पदावर नगर रचना आणि मुल्य निर्धारण संचालनालयाच्या दिनांक २२/१२/२०१७ रोजीच्या आदेशान्वये बदली करण्यात आलेली असून श्री.सोनावणी हे सदर पदावर कार्यरत आहेत.

---

## वसई-विरार शहर महानगरपालिकेला देय असलेल्या अनुदानाबाबत

**(५) ९०८७६ (२३-०८-२०१७). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार शहर महानगरपालिकेला त्यांच्या विकास कामांसाठी शासनाकडून रुपये ६,५३७.२० लक्ष एवढी अनुदानाची रक्कम येणे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त अप्राप्त अनुदानाची रक्कम वसई-विरार शहर महानगरपालिकेस तातडीने देण्यात यावी अशा प्रकारचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा. अर्थमंत्री यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वसई-विरार शहर महानगरपालिकेस देय असलेल्या अनुदानाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१८) :** (१) व (२) मा.श्री.हितेंद्र ठाकूर, विधानसभा सदस्य यांनी वसई विरार शहर महानगरपालिकेस शासनाकडून देय असलेल्या रुपये ६५३७.२० लक्ष दिनांक २१.०५.२०१७ च्या पत्रान्वये केली आहे.

(३) व (४) उपरोक्त देय अनुदानापैकी रुपये २२६२.२० लक्ष इतके अनुदान महानगरपालिकेस प्राप्त झाले असल्याचे वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## मुंबईत डॉ.अमरापूरकर यांचा मॅनहोलमध्ये पडून झालेला मृत्यू

**(६) ९४९६८ (१३-१०-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये दिनांक २९ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास झालेल्या अतिवृष्टीने सगळीकडे पाणी तुंबले होते व त्यात बॉम्बे रुग्णालयाचे डॉ. अमरापूरकर यांचा मॅनहोलमध्ये पडून मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने शासन व महानगरपालिका प्रशासनास नोटीस दिली असल्याचे दिनांक ०२ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घटना मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या दुर्लक्ष व हलगर्जीपणामुळे घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या दुर्घटनेस कोण जबाबदार आहे तसेच संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत व अशा दुर्घटना भविष्यात घडू नये म्हणून उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१८) :** (१) दिनांक २९.०८.२०१७ रोजी मुंबई शहर व उपनगरात झालेल्या अतिवृष्टीमुळे परिसर जलमय होऊन बॉम्बे हॉस्पिटलचे डॉ. दिपक अमरापूरकर यांचा एल्फिस्टन येथे मॅनहोलमध्ये पडून मृत्यू झाला होता.

(२) सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने नोटीस बजावली नसून, मा. न्यायालयात जनहित दाखल करण्यात आली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(३) स्थानिक लोकांनी मॅनहोल उघडून झाकण न बसविता सदर मॅनहोल उघडे सोडून दिल्यामुळे सदर दुर्घटना घडली असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) व (५) सदर दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या ६ स्थानिक नागरिकांपैकी ५ नागरिकांना दादर पोलीस ठाणे यांचेमार्फत अटक करण्यात असून, त्यांना भोईवाडा येथील मा. अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी न्यायालयाने प्रत्येकी रु.१५,०००/- रोख इतक्या जामिनावर मुक्त केले आहे.

सदर दुर्घटनेनंतर गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने, महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतर इसमांकडून हेतुपुरस्सर उघडण्यात येणाऱ्या मॅनहोलवरील झाकणामुळे अपघात होऊ नये याकरिता मुंबई शहर विभागातील पूर प्रवण ठिकाणांच्या पर्जन्य जलवाहिन्यांच्या मॅनहोलमध्ये सुरक्षा जाळया बसविण्याबाबतची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

मुंबई शहरात पर्जन्य जलवाहिन्यांवर एकूण २८,६७२ मॅनहोल्स आहेत. पूरप्रवण क्षेत्रांमध्ये सदर मॅनहोल्स उघडण्याची शक्यता असल्यामुळे महानगरपालिकेमार्फत पहिल्या टप्प्यामध्ये अतिधोकादायक अशा १४२५ ठिकाणी लोखंडी सुरक्षा जाळ्या बसविण्यात आल्या आहेत.

कोणत्या ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने जाळ्या बसविणे आवश्यक आहे याबाबत महानगरपालिकेकडून तपासणी करण्यात येत असून मागील कामातील अनुभवावरुन योग्य ते बदल करुन उर्वरित ठिकाणी लोखंडी सुरक्षा जाळ्या बसविण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**पनवेल महानगरपालिका हद्दीतील कळंबोली येथे सिडकोने निर्माण केलेल्या वसाहतीतील सेक्टर ४ ई येथील उद्यानाची दुरवस्था झाल्याबाबत**

**(७) ९५०८१ (३०-१२-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिका हद्दीतील कळंबोली येथे सिडको लि. ने निर्माण केलेल्या वसाहतीतील सेक्टर ४ ई येथील उद्यानाची अतिशय दुरवस्था झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उद्यानाची संरक्षक भिंत व कठडे तसेच प्रवेशद्वार तोडल्यामुळे उद्यानाचा वापर वाहने पार्किंग करण्यासाठी केला जात असल्यामुळे मुलांना खेळण्यास अडचणी निर्माण होत असून विजेची व्यवस्था बंद असल्यामुळे रात्री उद्यानात मद्यपींचा वावर वाढला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी रहिवाश्यांनी उद्यानाच्या झालेल्या दुरवस्थेबाबत व अनैतिक वापराबाबत संबंधित सिडको अधिका-यांकडे तक्रार करूनसुध्दा दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून उद्यानाची दुरवस्था दुर करण्याबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणा-या संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-१०-२०१८) :** (१), (२) व (३) कंळबोली नोडमधील सेक्टर ४ ई येथील भूखंड उद्यनासाठी नसून क्रिडांगणासाठी राखीव आहे. सदर क्रिडांगणाची संरक्षण भिंत, कठडे व प्रवेशव्दार मोडकळीस आल्याने त्यांच्या दुरुस्तीचे काम सिडकोच्या कळंबोली विभागामार्फत हाती घेण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने दि.१२.०३.२०१८ रोजी कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आली आहे. सदर दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यावर अनधिकृत पार्किंग, मद्यपिंचा वावर इ. बाबींवर निर्बंध ठेवणे शक्य होणार आहे. तसेच विद्युत दिव्यांची व्यवस्था करण्याच्या अनुषंगाने कंत्राट दिलेले असून सदर काम प्रगतीपथावर असून दि.११.०३.२०१९ पर्यंत पुर्ण करण्याचे सिडकोचे उद्दिष्ट आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी व वसई- विरार महानगरपालिकेंतर्गत भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात अनेक जण जखमी झाल्याबाबत**

**(८) ९५६९१ (०१-०१-२०१८). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहर महानगरपालिका (जि.ठाणे) क्षेत्रातील मागील नऊ महिन्यांपासून सुमारे ४ हजारहून अधिक नागरिकांवर भटक्या कुत्र्यांनी हल्या केल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी तालुक्यातील पडघा येथे भटक्या कुत्र्याच्या हल्ल्यात एका ८ वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वसई-विरार शहर महानगरपालिकेंतर्गत येणा-या अर्नाळा येथे राहणारी अपूर्वा तांडेल ही ८ वर्षीय मुलगी समुद्रकिनारी खेळत असताना १५ ते १६ भटक्या कुत्र्यांनी तिच्यावर हल्ला केल्याची धक्कादायक माहिती माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भिवंडी भागात भटक्या कुत्र्यांनी हल्ला केलेल्या व्यक्तिंमध्ये ३०० हून अधिक शाळकरी व कचरा वेचणा-या मुलांचा समावेश असून सात वर्षांत ७ नागरिकांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, गत ६ वर्षापासून महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून निर्बिजीकरण कार्यक्रम ठप्प असल्याने भटक्या कुत्र्यांची संख्या बेसुमार वाढली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१८) :** (१) व (२) भिवंडी शहर पोलीस हद्दीत फेनागांव येथे दिनांक १७.०९.२०१७ रोजी एका ८ ते ९ वर्षाच्या मुलावर भटक्या कुत्र्यांनी हल्ला करुन चावा घेतला. सदर जखमी मुलावर प्राथमिक उपचार करुन सिव्हील हॉस्पिटल, ठाणे येथे घेऊन जाताना त्याचा रस्त्यात मृत्यु झाला.

सदर अकस्मात मृत्यूची रजि.नं.८७/१७, दिनांक १७.०९.२०१७ रोजी सीआरपीसी कलम १७४ अन्वये नोंद करण्यात आली आहे.

पडघा येथे ८ वर्षाच्या मुलाचा मृत्यु झाल्याबाबत तक्रार प्राप्त नसल्याचे गृह विभागाने कळविले आहे.

(३) विरार (प.) येथील अर्नाळा समुद्र किनारी एका ८ वर्षीय मुलीवर खेळताना १५ ते १६ भटक्या कुत्र्यांनी हल्ला करुन जखमी केले हे खरे आहे.

(४) भिवंडी भागात सुमारे ७ वर्षात एका ८ ते ९ वर्षाच्या मुलावर कुत्र्याने हल्ला केल्याने मृत्यू झाला असल्याची घटना घडल्याचे गृह विभागाने कळविले आहे.

(५) भिवंडी निजामपुर शहर व वसई विरार शहर महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे:-

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने मे.ॲनिमल वेल्पेअर सोसायटी, अंबरनाथ यांची निविदा मंजुर करुन ऑक्टोबर, २०१२ पर्यंत १८८६८ श्वानांना रेबिज प्रतिबंधक लस दिली आहे.

तसेच भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात भटक्या कुत्र्यांचे स्थलांतर मायग्रेशन मोठ्या प्रमाणात होत असून भिवंडी शहरात भटके कुत्रे पकडून त्यांच्यावर प्रजनन शस्त्रक्रिया करणे त्यांना रेबिज प्रतिबंधक लस देणे यासाठी पुनश्च सर्वेक्षण करण्यात आले असून विहित कार्यपध्दतीनुसार निविदा प्रक्रिया करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील भटक्या कुत्र्यांवर प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदा, १९६० व पशु जन्म नियंत्रण नियमानुसार (कुत्रे), २००१ या कायद्यानुसार निर्बिजीकरण केंद्र स्थापन करण्यात आले असून दिनांक १४.१०.२०११ पासून भटक्या कुत्र्यांवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करुन रॅबीज प्रतिबंधक लस देण्यात येते. तसेच प्राणी प्रतिबंधक कायदा, २००१ अंतर्गत मॉनिटीअरींग कमिटी स्थापन करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोराळा (ता.रिसोड, जि.वाशिम) येथील बोराळा धरणावरुन जाणा-या पाईपलाईनच्या व्हॉल्वच्या गळतीमुळे शेतीचे झालेले नुकसान**

**(९) ९८८९७ (२६-१२-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोराळा (ता.रिसोड, जि.वाशिम) येथील बोराळा धरणावरुन जाणा-या पाईपलाईनच्या व्हॉल्वची गळती सुरु असल्यामुळे परिसरातील श्री.बबन मिटकरी व इतर काही शेतक-यांच्या शेत जमिनीत पाणी साचून शेतजमिनीचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाईपलाईनच्या व्हॉल्वची पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार व्हॉल्वची त्वरीत दुरुस्ती करण्यासह नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१८) :** (१), (२) व (३) सप्टेंबर, २०१७ मध्ये अशी घटना घडल्याचे आढळून आले नाही. मात्र दिनांक १५ जून, २०१७ रोजी अडोळ प्रकल्पापासून ३

कि.मी. अंतरावरील ढोरखेडा येथे व्हॉल्व नादुरुस्त झाल्याबाबत नगरपरिषदेस दूरध्वनीसंदेश प्राप्त झाला होता. त्याचदिवशी संध्याकाळी सदर व्हॉल्वची दुरुस्ती करण्यात आली.

• तथापि, दिनांक १७ जून, २०१७ रोजी तो पुन्हा नादुरुस्त झाल्याने तो कायमस्वरुपी बंद करण्यात आला आहे.

• गळतीमुळे शेतजमिनीचे कोणतेही नुकसान झालेले नाही वा तशी मागणीही नगरपरिषदेकडे करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वडाळा (मुंबई) येथे बेस्टच्या आगारात झालेल्या दसरा मेळाव्यात**
**बेस्ट कर्मचाऱ्यांनी केलेले गैरवर्तन**

**(१०) १०००३४ (०१-०१-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेस्टच्या वडाळा (मुंबई) आगारात झालेल्या दसरा मेळाव्यात बेस्ट कर्मचाऱ्यांनी अभिनेत्री माधवी जुवेकर हिच्यावर नोटा उडविल्याची धक्कादायक बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेस्ट उपक्रम तोट्यात असताना आणि वेतन वेळेवर मिळत नसताना कर्मचा-यांनी केलेला हा प्रकार संताप आणणारा आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी बेस्टच्या १३ सेवकवर्ग सदस्यांच्या विरोधात बेस्ट प्रशासनामार्फत करण्यात आलेल्या खातेनिहाय चौकशीत, त्यांचेवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द झाल्याने, ७ सेवकवर्ग सदस्यांना बडतर्फीची शिक्षा सुनावण्यात आली आहे व ६ सेवकवर्ग सदस्यांना वेतनश्रेणी कमी करण्याची शिक्षा देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागरी कमाल जमीन धारणा कायद्यांतर्गत न्यायमूर्ती श्रीकृष्णन यांच्या**
**अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीच्या अहवालाबाबत**

**(११) १०३३०९ (०१-०१-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागरी कमाल जमीन धारणा कायद्यांतर्गत जमिनीच्या प्रश्नावर न्यायमूर्ती श्रीकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने एक समिती गठीत केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, तसेच सदर समितीच्या अहवालात नमूद केलेल्या शिफारशींचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सदर शिफारशींच्या अंमलबजावणीबाबतची सद्यस्थिती काय आहे,
(४) असल्यास, सदरहू समितीचा अहवाल अद्याप प्राप्त झाला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे, श्री.बी.एन.श्रीकृष्णा, सेवानिवृत्त न्यायमुर्ती, मा.सर्वोच्च न्यायालय व श्री.बी.एन.मखिजा, सेवानिवृत्त सचिव आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन यांची व्दिसदस्यीय समिती दि.१६.०६.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत केली आहे.
(२) व्दिसदस्यीय समितीने याबाबतचा अहवाल अद्यापपर्यंत शासनास सादर केला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोअर परळ (मुंबई) येथील कमला मिल कंपाऊंड मधील ट्रेड हाऊस**
**या इमारतीला लागलेली आग**

**(१२) १०४७४५ (१४-०५-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोअर परळ (मुंबई) येथील कमला मिल कंपाऊंड मधील ट्रेड हाऊस या इमारतीला दिनांक २८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मध्यरात्री अचानक आग लागून लाखो रुपयांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आगीमध्ये निष्पाप १४ जणांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, आगीमध्ये मृत झालेल्यांच्या नातेवाईकांना व जखमींना कोणती मदत देण्यात आली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१८) :** (१) व (२) लोअर परळ येथील कमला मिल कंपाऊंडमधील ट्रेड हाऊस या इमारतीतील 'वन अबव्ह' आणि 'मोजोस ब्रिस्टो' या दोन रेस्टोपबमध्ये दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजी लागलेल्या भीषण आगीत १४ जणांचा मृत्यु झाला असून, ५४ जण जखमी झाले आहेत व अग्निशमन दलाचा १ जवान जखमी झाला आहे ही वस्तुस्थिती आहे.

(३), (४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने सदर आगीच्या दुर्घटनेची चौकशी केली असता, सदर आग "आगीचे उडते निखारे जळाऊ कापडाशी संपर्कात आल्यामुळे" व सदर आगीची सुरुवात ही "मोजोस बिस्ट्रो" रेस्टॉरंटमध्ये झाली असल्याचे निष्पन्न झाले.

सदर दुर्घटनेशी संबंधित मुंबई अग्निशमन दलाचे सहाय्यक विभागीय अग्निशमन अधिकारी यांना महानगरपालिकेच्या सेवेतून निलंबित करण्यात आले असून, एक केंद्र अधिकारी यांना ना.म. जोशी मार्ग पोलीस ठाण्यामार्फत दिनांक २०.०१.२०१८ रोजी अटक झाल्यानंतर निलंबित करण्यात आले आहे.

सदर प्रकरणी ना.म. जोशी मार्ग पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २९१/२०१८ कलम ३०४, ३३७, ३३८, २१६, २८५, १९७, १९८, ४७१, ४६६, ४६७, ३४ भा.द.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, १३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी प्राथमिक चौकशी करुन अहवाल शासनास सादर केला आहे.

सदर चौकशी अहवालामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध खात्यांत कार्यरत असलेल्या एकूण १२ अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द खात्यांतर्गत सर्वंकष चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले असून, खात्यांतर्गत चौकशीची कार्यवाही करण्यात येत आहे.

सदर प्रकरणी अन्य कर्मचाऱ्यांचा सहभाग निश्चित करण्याच्या दृष्टीने पुढील तपास सुरु आहे.

सदर घटनेतील मृतांच्या नातेवाईकांना व जखमींना आर्थिक मदत देण्यात आलेली नाही.

---

**नाशिक शहरातील गावठाणाचा विकास करण्याबाबत**

**(१३) १०५२०९ (०६-०४-२०१८). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील गावठाणाचा विकास करण्यासाठी ४ एफ.एस.आय करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.आयुक्त, नाशिक महानगरपालिका नाशिक व दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा. मुख्यमंत्री यांच्याकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी गावठाणाचा विकास करण्यासाठी एफ.एस.आय वाढविण्याकरिता कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कोणती कारणे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-१०-२०१८) :** (१) होय.

(२) नाशिक महानगरपालिकेने सूधारित विकास योजना, विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीसह महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३० अन्वये शासनास मंजूरीसाठी सादर केली होती. सदर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीत नियम क्र.४० अन्वये क्लस्टर डेव्हेलपमेंट ऑफ कोअर ऐरीयाची तरतूद ४ एफ.एस.आय. सह नाशिक महानगरपालिकेने प्रस्तावीत केली होती.

शासनाने उक्त सुधारित विकास योजना, विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीसह शासन अधिसुचना क्र.टिपीएस-१११६/प्र.क्र.१४०(अ) /२०१६/नवि-९, दि.०९ जानेवारी २०१७ अन्वये मंजूर केली आहे.

मा.मुंबई उच्च न्यायालयामधील जनहित याचिका क्र. ६१/ २०१४ मधील न्यायालयीन आदेश विचारात घेता समूह विकास योजनेतील (Cluster Development) वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करताना सदर वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकामुळे तसेच शहरातील पायाभूत सुविधावर होणाऱ्या परिणामासंदर्भात आघात मूल्यमापन अहवाल (Impact Assessment Report) तयार करुन त्याची पडताळणी करणे आवश्यक आहे. यासंदर्भात इतर महानगरपालिकेकडून तशी कार्यवाही झालेली आहे. ही बाब विचारात घेता उक्त नियमावलीतील नियम क्र.४० अन्वये क्लस्टर डेव्हेलपमेंट ऑफ कोअर ऐरीयासाठी नाशिक महानगरपालिकेने प्रस्तावित केलेली तरतूद स्थगित ठेवण्यात आलेली होती.

त्याअनुषंगाने सदर योजनमध्ये देण्यात येणाऱ्या वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकामुळे शहरातील विद्यमान पायाभूत सोयी सुविधा यांच्यावर होणारा परिणाम / आघात यांचा सर्वकष अभ्यास करुन आघात मूल्यमापन अहवाल शासनास सादर करण्याबाबत दि.१३.०७.२०१८ रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेला कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खारघर येथील सेंट्रल पार्कमध्ये अनेक सुविधांची कमतरता असल्याबाबत**

**(१४) १०६१२९ (१९-०४-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई सिडको प्रशासनाने सुमारे १०० एकर क्षेत्रात उभारलेल्या खारघर येथील सेंट्रल पार्कमध्ये अनेक सुविधांच्या कमतरतेमुळे पर्यटकांची तसेच नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोटयवधी रूपये खर्च करून उभारलेल्या सेंट्रल पार्कची दुरवस्था झाली असून तुट्लेली संगीत वाद्ये, बंद असलेला फुडप्लाझा, गेटवर असलेले अनधिकृत फेरीवाले, बंद असलेले कारंजे, तुटलेली खेळणी, नादुरूस्त अवस्थेत असलेले धोकादायक विजेचे खांब अशा अनेक प्रकारच्या गैरसोयीमुळे पर्यटकांच्या व नागरिकांच्या सुरक्षतेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोटयवधी रूपये खर्च करून उभारलेल्या सेंट्रल पार्कच्या कामात दुर्लक्ष करणा-या संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-१०-२०१८) :** (१) व (२) सिडको महामंडळाकडून लंडन येथील हाईड पार्क व न्युयॉर्क येथील सेंट्रल पार्कच्या धर्तीवर खारघर, नवी मुंबई येथे सुमारे ८० हे. जमिनीवर सेंट्रल पार्क विकसित करण्यात येत आहे. सदर पार्क खारघर येथील सेक्टर २३ व २४ या दोन टप्प्यात विभागला गेला आहे. सद्यस्थितीत, पहिल्या टप्प्यात विकसित झालेला पार्क सन २०१० मध्ये नागरिकांसाठी खुला केला असून पार्कच्या उभारणीपासून देखभालीचा सर्व खर्च सिडकोमार्फत करण्यात येत आहे.

सदर पार्कच्या एकंदरीत देखभाल व दुरुस्तीचे काम जानेवारी, २०१७ पासून मे.सृष्टी कन्सल्टन्ट ॲन्ड डेव्हलपर्स या कंत्राटदारास देण्यात आले असून त्या कामांतर्गत पार्कमधील लॉन व गार्डनची साफसफाई, शौचालयाची स्वच्छता, फुलझाडे, खेळणी, पाण्याचे पंप इ.ची देखभाल व दुरुस्तीच्या कामांचा समावेश असून या बाबी नियमितपणे पार पाडल्या जातात.

तसेच, सेंट्रल पार्कमध्ये बोलार्ड प्रकारचे व विजेच्या खांबावरील दिवे लावण्यात आले असून विजेच्या खांबावरील दिवे चालू स्थितीत असून त्यांच्यामार्फत पुरेसा प्रकाश उपलब्ध होतो.

खारघर, सेक्टर २३ मधील विकसित व सेक्टर २४ मधील नियोजित अविकसित पार्क हा "संकल्पीत करुन बांधा वापरा व हस्तांतरीत करा" या धर्तीवर विकसित करण्यासंदर्भातील कामाच्या निविदा काढल्या असून त्याअंतर्गत पार्कमधील सर्व नादुरुस्त साधनांची दुरुस्ती करण्याचा समावेश करण्यात आलेला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहर व उपनगरामध्ये महानगरपालिकेच्या शाळांमध्ये इयत्ता १ ली या वर्गात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांची संख्या कमी होत असल्याबाबत**

**(१५) १०६४३१ (१२-०४-२०१८). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरामध्ये महानगरपालिकेच्या शाळांमध्ये सन २००८-२००९ या वार्षिक वर्षात इयत्ता १ ली या वर्गात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांची संख्या ६३,३९२ होती, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, सन २०१६-१७ मध्ये प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांची संख्या ३२,२१८ झाली आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांची संख्या कमी होण्याची कारणे काय आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) व २) सर्व शिक्षा अभियान वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकानुसार सन २००८-०९ या वर्षात इयत्ता १ ली या वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ६९,९०९ इतकी असून. सन २०१६-१७ या वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ३३,४०७ इतकी आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात देशातील सर्व राज्यांतून कुटुंबाचे कामानिमित्त स्थलांतर होते. काही दिवसांनी सदर कुटुंबे मुलांसह स्थलांतरीत होतात. त्यामुळे काही अंशी मुलांची संख्या कमी होते.

तसेच आपल्या पाल्याने इंग्रजी माध्यमातून शिक्षण घ्यावे अशी पालकांची मानसिकता असल्याने इंग्रजी माध्यमाकडे पालकांचा कल वाढत चालला आहे.

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांतील इतर माध्यमांतील विद्यार्थ्यांची संख्या कमी होत असली तरी महानगरपालिकेच्या मुंबई पब्लिक स्कूलमधील विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपलिकेच्या नगररचना विभागाने अग्निशमन दलाची यंत्रणा सक्षम नसताना १९ माळ्यांच्या इमारतीस परवानगी दिल्याबाबत

**(१६) १०६६२९ (१९-०४-२०१८). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपलिकेच्या नगररचना विभागाने अग्निशमन दलाची यंत्रणा सक्षम नसताना १९ माळ्यांच्या इमारतीस परवानगी दिल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदर्शनास आले तदनुसार १९ माळ्यांची इमारत बांधकाम परवानगी देण्यासाठी लागणाऱ्या अटी व शर्ती कुळगाव बदलापूर नगरपालिकेने पूर्ण केल्या आहेत काय,

(३) असल्यास, १९ माळ्याची इमारत बांधकामास परवानगी देणाऱ्या नगरपालिकेच्या सबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१८) :** (१) कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपलिकेच्या नगररचना विभागाने १९ माळ्यांच्या इमारतीस परवानगी दिली असल्याचे जिल्हाधिकारी, ठाणे यांनी कळविले आहे.

(२) व (३) वरील प्रमाणे परवानगी अनुज्ञेय करताना बांधकाम विषयक अटी व शर्ती, व बांधकामविषयक विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीचे पालन नगरपरिषदेने केली किंवा कसे याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांच्यास्तरावरुन छाननी करून नियमानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, ठाणे यांना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या “ए” वॉर्डात सुरु असलेल्या असंख्य बेकायदेशीर बांधकामाबाबत**

**(१७) १०७२६९ (१२-०४-२०१८). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या “ए” वॉर्डात सुरु असलेल्या असंख्य बेकायदेशीर बांधकामा संदर्भात माहे ऑक्टोबर, २०१७ च्या शेवटच्या आठवडयात वा त्या दरम्यान आयोजित केलेल्या बैठकीमध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बेकायदेशीर बांधकामा विरोधात तातडीने कारवाई करणे आवश्यक असतांनाही ए वॉर्डाचे संबंधित अधिकारी या कारवाईस हेतूत: अर्थपूर्ण विलंब करीत असल्याने त्यांचेविरुध्द महानगरपालिका प्रशासनाने कोणतीच कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, मॅजेस्टीक आमदार निवासा समोरील भगतसिंग मार्गावरील मेट्रो हाऊसला दोन ते तीन वर्षापूर्वी लागलेली आग त्यामध्ये सदर इमारतीचा ६० ते ८० टक्के भाग जळून नष्ट होणे या इमारतीच्या मालकांनी अग्निशमन दल, महानगरपालिका, जे.एन.पी.टी., जिल्हाधिकारी इत्यादी कोणाचीही परवानगी न घेता इमारतीची केलेली पुर्नबांधणी व त्यात केलेले वाढीव बांधकाम याविरोधात लोकप्रतिनिधी, नागरिक व सामाजिक संस्थांनी असंख्य तक्रारी करुनही सदर बेकायदेशीर बांधकाम करणाऱ्या जागा मालका विरोधात कोणतीच कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, ए वॉर्डातील असंख्य बेकायदेशीर बांधकामांकडे जागा मालकांशी आर्थिक संगनमत करुन संबंधित सहाय्यक आयुक्त दुर्लक्ष करीत असल्याचे अनेक घटनांमधून निदर्शनास येऊनही कर्तव्यात कसूर व बेजबाबदार वर्तन केल्याबद्दल ए वॉर्डच्या सहाय्यक आयुक्तांविरुध्द प्रशासकीय नियमानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१८) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या “ए” वॉर्डमधील बेकायदेशीर बांधकामांसंदर्भात मा. उपसभापती, विधानपरिषद यांचे दालनात दिनांक २५ ऑक्टोबर, २०१७ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती ही वस्तुस्थिती आहे.

(२), (३), (४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या “ए” वॉर्डमधील मेट्रो हाऊस या इमारतीच्या सी विंगमधील दुसऱ्या मजल्यावर विनापरवाना कोबा लादी स्लॅबचे बांधकाम सुरु असल्याने व सदर इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर विनापरवाना फायबरच्या पत्र्याचे छप्पर उभारल्याने सदर दोन्ही प्रकरणी मे. मेट्रो हाऊस प्रा. लि. यांना मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५४ए अन्वये अनुक्रमे दिनांक ०४.०२.२०१७ रोजी व दिनांक १५.०५.२०१७ रोजी नोटीस देण्यात आली. तद्नंतर सदर अनधिकृत बांधकामे महानगरपालिकेमार्फत निष्कासित करण्यात आली.

सदर इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर दिनांक २७.१०.२०१७ रोजी पुन्हा छप्पर उभारल्याचे महानगरपालिकेस आढळून आल्याने, सदर अनधिकृत छप्पर २४ तासांत काढण्याकरिता संबंधितांस महानगरपालिकेमार्फत दिनांक २८.१०.२०१७ रोजीच्या पत्रान्वये आदेश देण्यात आले.

तथापि मे. मेट्रो हाऊस प्रा.लि. यांनी दिनांक १५.०५.२०१७ रोजीची नोटीस व दिनांक २८.१०.२०१७ रोजीचे पत्राविरुध्द मा. दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई येथे बी.सी.सी.सी. क्रमांक २३९७/२०१७ अन्वये दावा दाखल केला.

सदर प्रकरणी दिनांक ०१.११.२०१७ रोजीच्या सुनावणीत मा.न्यायालयाने, सदर बाबतीत कोणतीही कारवाई करु नये असे आदेश दिले.

त्या दरम्यान मे. मेट्रो हाऊस प्रा.लि. यांनी मुंबई ट्रस्ट विरोधात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या रिट याचिका क्रमांक ३१९९/२०१७ च्या सुनावणी दरम्यान, मे. मेट्रो हाऊस प्रा.लि. यांनी केलेली किरकोळ डागडुजीबाबतची मागणी मान्य केली होती.

तद्नंतर दिनांक २६.१२.२०१७ सदर जागेची महानगरपालिकेमार्फत पाहणी करण्यात आली असता, सदर इमारतीच्या सी विंगमधील दुसऱ्या मजल्यावर पूर्वी निष्कासित करण्यात आलेल्या कोबा लादी स्लॅबची पुनर्बांधणी सुरु असल्याचे आढळून आल्याने, सदर अनधिकृत बांधकाम २४ तासांमध्ये काढण्याकरिता मे. मेट्रो हाऊस प्रा.लि. यांना दिनांक २८.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये आदेश देण्यात आले.

तथापि, पक्षकाराने सदर आदेशाविरुध्द मा. दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई येथे दिनांक २९.१२.२०१७ रोजी बी.सी.सी.सी. क्रमांक २३९७/२०१७ अन्वये दावा दाखल केला. त्यानुसार सदर प्रकरणी कोणतीही कारवाई करु नये असे आदेश दिले आहेत.

तद्नंतर सदर इमारतीच्या बी व सी विंगमधील तिसऱ्या मजल्यावर अनधिकृतपणे सिपोरेक्स भिंतीचे बांधकाम/फेरफार केल्याने, मे. मेट्रो हाऊस प्रा.लि. यांना महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५४ए अन्वये दिनांक ०२.०२.२०१८ रोजी नोटीस बजावण्यात आली.

सदर नोटीशीविरुध्द पक्षकाराने मा. दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई येथे बी.सी.सी.सी. क्रमांक ३७७/२०१८ अन्वये दाखल केलेल्या दाव्यात, दिनांक ०९.०२.२०१८ रोजी मा.न्यायालयाने स्थगिती (Status-quo) आदेश दिले आहेत.

सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असून, महानगरपालिकेमार्फत मा.न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

---

**वैतरणा (मोडकसागर) धरणामुळे टेंभा गाव प्रकल्पग्रस्त म्हणून घोषीत करण्याची केलेली मागणी**

**(१८) १०७२९२ (१८-०४-२०१८). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैतरणा (मोडकसागर) धरणात टेंभा गावातील नागरीकांच्या जमिनी व घरे गेल्याने टेंभा गाव प्रकल्पग्रस्त म्हणून घोषित करण्याची मागणी जिल्हाधिकारी यांचेकडे शहापूरचे लोकप्रतिनिधी यांनी माहे डिसेंबर, २०१७ च्या शेवटच्या आठवडयात केली आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेने वैतरणा मोडकसागर धरणासाठी शहापूर तालुक्यातील टेंभा गावातील स्थानिक भूमिपुत्रांची व शेतक-यांची शेकडो एकर जमिन संपादित केली परंतु त्यांना मुलभूत सुविधा देण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१८) :** (१) अशा प्रकारची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २५.१२.२०१७ रोजीच्या निवेदनाद्वारे केली आहे ही वस्तुस्थिती आहे.
(२) व (३) मुंबई शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने सन १९४७-४८ मण्से वैतरणा-तानसा योजना हाती घेऊन सन १९५५ मध्ये पूर्ण केली.

सदर योजनेत बृहन्मुंबई महानगरपालिकेने वैतरणा जलाशय, पाणी वाहून नेणारा बोगदा, पाईपलाईन व टेंभा तानसा रस्ता याकरिता भूसंपादन केले. त्यात टेंभा गावातील एकाही रहिवाशास विस्थापित होण्याची गरज भासली नाही.

वैतरणा जलाशयासाठी महानगरपालिकेमार्फत टेंभा गावातील एकूण १५७५ एकर १४ गुंठे २ आणे इनाम वन जमीन व १३५८ एकर शासकीय वन जमीन संपादित करण्यात आली आहे.

पाणी वाहून नेणारा बोगदा व पाईपलाईनसाठी बेलवड व त्यापुढील गावांची जमीन संपादित केली असून, त्यामध्ये टेंभा गावातील जमिनीचा समावेश नाही.

टेंभा गावातील खाजगी जमीन फक्त रस्त्यासाठी संपादित करण्यात आली असून, त्यासाठी त्यांना आर्थिक मोबदला देण्यात आला असून, गावातील व्यक्तींना बृहन्मुंबई महानगरपालिकेत नोकरी देण्यात आली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

टेंभा ग्रामपंचायतीला बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नळ जोडणी देऊन पिण्याच्या पाण्यासह दवाखाना व शाळा इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने टेंभा परिसरातील रस्ते देखभाल व दुरुस्तीसाठी ताब्यात घेतले असून, सदर रस्त्यांची योग्य ती देखभाल करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उल्हासनगरच्या (जि.ठाणे) येथील जिन्स पँट बनविणाऱ्या तसेच वॉश करणाऱ्या कारखान्यांवर छापा टाकल्याबाबत

**(१९) १०८०८४ (१८-०४-२०१८). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगरच्या महानगरपालिका आयुक्तांच्या उपस्थितीत वालधुनी नदीच्या शेजारी असणाऱ्या जिन्स पँट बनविणाऱ्या तसेच वॉश करणाऱ्या कारखान्यांवर छापा टाकून अनिल रोहरा यांच्या सम्राट अशोक नगर येथील कारखान्यात जिन्स वॉशचे काम सुरु असताना

रंगेहाथ पकडून लाखो रुपयांचा माल दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास पकडला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या एका छाप्यात एकूण किती रुपयांचा माल जप्त करण्यात आला व सदर प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी न करणाऱ्या श्री.अनिल रोहरा यांच्या कारखान्याविरोधात तसेच मालका विरोधात शासनाचे सिल तोडून बेकायदेशीररित्या सर्वोच्च न्यायालयाचा आदेश मोडून काम सुरु ठेवल्याबद्दल कोणकोणत्या कलमाखाली कारवाई करण्यात आली व अशी एकूण किती व्यक्ती व कारखान्यांविरोधात कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) असल्यास, ज्या कारखान्यांनी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार लावण्यात आलेले सिल तोडून जिन्स वॉशचे काम पुन्हा सुरु केले होते अशा संबंधित व्यक्ती व कारखान्या विरोधात कारवाई करण्याकरीता मा.सर्वोच्च न्यायालयाने कोणती मार्गदर्शक तत्त्वे वा नियम महानगरपालिकेला ठरवून दिले आहेत तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाकडे झालेल्या अवमान प्रकरणी कोणत्या शिक्षेची तरतूद आहे याबाबतचा खुलासा मागितला आहे काय,
(४) असल्यास, या संबंधित सर्व कारखान्यां विरोधात पर्यावरण व नगरविकास विभागाच्या प्रचलित नवीन कायद्यानुसार कारवाई करण्यात आली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१८) :** (१) दिनांक ०९.०१.२०१८ रोजी श्री. दिलीप रोहरा यांच्या कारखान्यावर उल्हासनगर महानगरपालिकेने धाड टाकून कारखाना सीलबंद केला होता.

तसेच, उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात दिनांक ११.०१.२०१८ रोजी जिन्स वॉशचे काम करणारे ५ कारखाने सुरु असल्याचे आढळून आल्याने, सदर कारखाने सीलबंद करण्यात आले होते.

(२) सदर कारवाईत उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत सुमारे २००० जिन्स पॅन्ट जप्त करण्यात आल्या होत्या.

सदर कारखानदारांनी शासनाचे कोणतेही सील तोडलेले नसल्यामुळे त्यांच्यावर उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत कारवाई करण्यात आली नाही.

(३) सदर सीलबंद केलेल्या कारखान्यात त्यांचा माल पडून असल्याने, तो परत मिळण्यासाठी कारखानदारांनी उल्हासनगर महानगरपालिकेस केलेल्या विनंतीस अनुसरुन, सदर कारखानदारांनी दिनांक ०१.०२.२०१८ रोजी हमीपत्र लिहून दिले. त्यामुळे उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत दिनांक २१.०२.२०१८ रोजी कारखान्यांचे सील उघडून देण्यात आले होते.

वालधुनी नदीत कारखान्यांमुळे प्रदुषण होऊ नये म्हणून कारवाई करणेसाठी मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले असल्याचे उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(४) सदर जीन्स कारखानदारांनी अनधिकृतरित्या वीज जोडणी घेऊन कारखाने सुरु ठेवल्याने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने संबंधित कारखानदारांविरुध्द दिनांक २२.०१.२०१८ रोजी स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्हयातील पालिकेच्या शाळांमध्ये मुख्याध्यापकांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(२०) १०८५४३ (१८-०४-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील ढिसाळ कारभारामुळे गत दोन वर्षापासून पालिकेच्या ८० टक्के शाळांमध्ये मुख्याध्यापकांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्हयातील मुख्याध्यापकांची नेमणूक न करण्याची कारणे काय आहेत व त्या अनुषंगाने कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे, तसेच कार्यवाही पूर्ण होण्यास किती कालावधी अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१८) :** (१) व २) ठाणे जिल्ह्यामधील महानगरपालिका तसेच नगरपालिकेतील मुख्याध्यापकाच्या पदांबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे,

| मनपा | मंजुर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| ठाणे | ९७ | ३८ | ५९ |
| कल्याण-डोंबिवली | २२ | १४ | ०८ |
| नवी मुंबई | ४८ | २६ | २२ |
| भिवंडी-निजामपुर | ७९ | ४८ | ३१ |
| उल्हासनगर | १९ | ९ | १० |
| मीरा-भाईंदर | १९ | ०९ | १० |
| अंबरनाथ | ६ | ६ | ० |
| कुळगाव-बदलापुर | ५ | ० | ५ |
| एकूण | २९५ | १५० | १४५ |

तसेच ठाणे जिल्ह्यातील महानगरपालिका व नगरपालिकेतील मुख्याध्यापकांची पदे भरण्याबाबत नियमोचित कार्यवाही सुरू आहे.

याबाबत नियमोचित कार्यवाही करण्याच्या सूचना ठाणे जिल्ह्यातील सर्व महानगरपालिका तसेच नगरपालिकांना देण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर शहरातील दोन हजार स्क्वेअर फुटापर्यंतच्या प्रलंबित असलेल्या बांधकाम परवानग्यांबाबत**

**(२१) १०८९२८ (०३-०४-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दोन हजार स्क्वेअर फुटापर्यंतच्या बांधकामाचे अधिकार आर्किटेक्ट, सर्वेक्षक व इंजिनीअर यांना देण्याचा निर्णय शासन निर्णयानुसार निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर महानगरपालिका प्रशासनाकडून आजही सर्वच बांधकामांचे परवाने नगररचना विभागाकडून देण्यात येत असल्याने निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे शहरात दोन हजार स्क्वेअर फुटापर्यंतची अनेक बांधकामे परवानगीच्या प्रतीक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासन निर्णयाची अंमलबजावणी करून दोन हजार स्क्वेअर फुटापर्यंतचे प्रलंबित बांधकाम परवाने निकाली काढणेबाबत शासनाने कोल्हापूर महानगरपालिकेस कोणत्या सूचना दिल्या वा देणार आहे,
(५) असल्यास, शासन निर्णयाची अंमलबजावणी न करणाऱ्यांवर शासन कोणती कायदेशीर कारवाई करणार वा करित आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१८) :** (१) शासन निर्णय क्र. पीबीपी-४३१७/१०९/प्र.क्र.११/२०१७/ नवि-११, दि.२८/०८/२०१७ रोजीच्या आदेशान्वये जोखीम आधारीत इमारत परवानगी मंजुरी प्रक्रीयेंतर्गत १५० चौ.मी. ते २०० चौ.मी. पर्यंतच्या बांधकाम क्षेत्रांना आर्किटेक्ट/ सर्वेक्षक, परवानाधारक अभियंते यांना प्रोव्हीजनल मंजुरी अधिकार देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(२), (३) व (४) वरील नमूद शासन निर्णयात विहीत कार्यपध्दतीस अनुसरुन कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत जाहिर प्रकटिकरण व प्रसिध्दी करण्यात आली आहे.
बांधकाम परवानगी देताना या आदेशात नमूद मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करुन बांधकाम परवाने देण्यात येत आहेत, असे महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डहाणू नगर परिषदेतील (जि.पालघर) तीर्थम संकुल बांधकाम परवानगीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२२) १०९७२८ (१८-०४-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू नगरपरिषद क्षेत्रातील तीर्थम संकुल बांधकाम करताना विकास नियम,पर्यावरण व नदीपात्रालगतच्या बांधकामाचे नियम डावलून भोगवटा प्रमाणत्र दिल्याचे दि.०८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तीर्थम संकुल बांधकाम प्रकरणी सर्व नियमांचे उल्लंघन करुन डहाणू नगरपरिषदेने भोगवटा प्रमाणत्र कोणत्या आधारे दिले आहे,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१८) :**(१) जिल्हाधिकारी, पालघर यांच्या अहवालानुसार डहाणू नगरपरिषद क्षेत्रातील तीर्थम संकुल या बांधकामास डिसेंबर, २०१५ मध्ये डहाणू नगरपरिषदेने भोगवटा प्रमाणपत्र दिले आहे, हे खरे आहे.

(२) तिर्थम संकुलाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यावर डहाणू नगरपरिषदेच्या नगर अभियंत्याने बांधकामाची पहाणी करुन त्यांनी सादर केलेल्या अहवालाच्या आधारे डहाणू नगरपरिषदेने उक्त भोगवटा प्रमाणपत्र दिल्याचे जिल्हाधिकारी, पालघर यांनी कळविले आहे.
(३) सदर प्रकरणी बांधकाम परवानगी देताना विकास नियंत्रण नियमावलीमधील विहित तरतुदी पर्यावरण व नदी पात्रा लगतच्या बांधकामाचे सर्व प्रचलित अटी व शर्ती यांची तपासणी नगरपरिषदेने केली किंवा कसे याबाबत जिल्हाधिकारी, पालघर यांना सखोल चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे सूचित केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उरण शहरात सिडको -रेल्वेचे उड्डाणपूलाचे खोदकाम सुरु असतांना उरण शहराला पाणी पुरवठा करणारी पाईपलाईन फुटल्याबाबत

**(२३) १०९८५३ (१२-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण शहरात सिडको -रेल्वेचे उड्डाणपूलाचे खोदकाम सुरु असतांना उरण शहराला पाणी पुरवठा करणारी पाईपलाईन दिनांक २६ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास फुटली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे उरण शहराचा पाणी पुरवठा बंद झाला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खोदकाम करतांना आवश्यक ती खबरदारी न घेतल्याबाबत संबधित ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-१०-२०१८) :** (१) व (२) प्रस्तावित नेरुळ-उरण रेल्वे मार्गावरील उरण रेल्वे स्थानकानजीकच्या उड्डाणपुलाजवळ अस्तित्वात असलेल्या कच्च्या रस्त्यामध्ये दि.२४.१२.२०१७ रोजी पाईपलाईन फुटली होती. सदर पाईपलाईन ही रेल्वे उड्डाणपुलाच्या खोदकामामुळे फुटलेली नाही. तथापि, एम.आय.डी.सी. ने दि.२५.१२.२०१७ रोजी सदर पाईपलाईन दुरुस्त केली आहे.

तसेच सिडको महामंडळाच्या दि.०७.११.२०१७, दि.१९.०१.२०१८ रोजीच्या पत्रांन्वये सिडको महामंडळाकडून सदर पाईपलाईनची काळजी घेणेबाबत एम.आय.डी.सी. यांना कळविण्यात आलेले आहे.
(३) सदर पाईपलाईन ही रेल्वे उड्डाणपुलाच्या खोदकामामुळे फुटलेली नाही. तसेच सिडकोच्या ठेकेदाराने सर्व्हिस रोडमध्ये काम केलेले नाही त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये (जि.ठाणे) वर्ग-१ ते वर्ग ४ चे अधिकारी व कर्मचा-यांच्या रिक्त पदांबाबत**

**(२४) ११०७८९ (१८-०४-२०१८). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिकेच्या विविध स्तरावरील व प्रामुख्याने वर्ग १ व २ या श्रेणीतील अन्य महत्वाची पदे रिक्त असल्याने दैनंदिन व महत्वाची कामे करताना प्रशासनास मोठ्या प्रमाणात अडचणींना सामोरे जावे लागत असल्यामुळे सर्व संविधानिक व मुलभूत नागरी सुविधांची कामे पूर्ण करण्यास मोठ्या प्रमाणात अडचणी येत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त यांनी शासनास कळविले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१८) :** (१) उल्हासनगर महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांची पदे मोठया प्रमाणात रिक्त असल्याबाबत या विषयावरील स्थानिक लोकप्रतिनिधींचे दिनांक २८.०६.२०१८ रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे.

(२), (३) व (४) सदर रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**सावनेर नगरपालिकेने (जि.नागपूर) केलेल्या जमिन गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(२५) ११०८६६ (१८-०४-२०१८). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावनेर नगरपालिकेने (जि.नागपूर) अकृषक परवानगी न घेता रहिवासी वापरासाठी उपयोग करणे, गुंठेवारी कायदयाचा बेकायदेशीररित्या आधार घेवून कुठलीही मौका चौकशी न करता प्लॉटचे नियमीतीकरण करणे, दिनांक १/१/२००१ नंतरचे प्लॉट अधिकार नसंताना नियमीतकरण करणे, विकास शुल्क वसूल न करणे, सार्वजनिक वापरासाठी जागा न सोडणे इत्यादी गंभीर प्रकार करून जमिन गैरव्यवहार केला असल्याची तक्रार लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास उपविभागीय अधिकारी सावनेर यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गंभीर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्याचा तपशिल काय आहे, चौकशी अंती शासनाने संबधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०१८) :** (१) होय.

(२) उपविभागीय अधिकारी, सावनेर यांनी याबाबत प्राथमिक चौकशी करुन त्यांचा अहवाल जिल्हाधिकारी, नागपूर यांना सादर केला आहे. भूखंड नियमाधीन करताना मुख्याधिकारी, नगरपरिषद सावनेर यांच्याकडून नियमांचे उल्लंघन झाल्याचे प्राथमिक निष्कर्ष सदर अहवालात नमूद करण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी, नागपूर यांना या अहवालावर सत्वर कार्यवाही करण्यास कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर (जि.सोलापूर) येथील पंढरपूर शहरातील घनकचऱ्याच्या समस्येबाबत**

**(२६) ११०९३१ (१९-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथील श्रीक्षेत्र असणारे पंढरपूर शहरामध्ये धुळ, दुर्गंधी व घनकचऱ्याच्या समस्याने विळखा घातला असून त्यामुळे शहरातील नागरिक मलेरिया, हिवताप, डेंग्यु अशा साथींच्या जीवघेण्या आजारांना बळी पडल्याचे दिनांक १६ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंढरपूर नगरपालिका प्रशासन व आरोग्य विभाग यांच्या दुर्लक्षामुळे निष्पाप नागरिकांना जीवघेण्या आजारांना सामोरे जावे लागत असल्यामुळे नागरिकांनी अनेकदा नगरपालिका प्रशासनाकडे तक्रारी/निवेदने देऊनही अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित नगरपालिका प्रशासन यांना शासनाकडून शहरातील स्वच्छता व नागरिकांचे आरोग्य जोपासण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश प्रशासनाकडून देण्यात आले वा देण्यात येणार आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०१८) :** (१) पंढरपूर शहरात ११ डेंग्यू संशयित रुग्ण डिसेंबर, २०१७ मध्ये आढळून आले होते. तथापि, तपासणीअंती त्यांना डेंग्यू झाल्याचे आढळून आले नाही.

(२) आरोग्याच्या अनुषंगाने नागरिकांच्या तक्रारी/निवेदने नगरपरिषदेस प्राप्त होतात. त्यासाठी नागरिकांचे तक्रार रजिस्टर नगरपरिषदेकडे ठेवले आहे. त्यामधील नोंदीनुसार नियमितपणे तक्रारीचे निवारण नगरपरिषदेकडून केले जाते.

(३) • नागरिकांचे आरोग्य जपण्यासाठी नगरपरिषदेकडून डास अळी प्रतिबंधक फवारणी, कंटेनर सर्व्हेक्षण अंतर्गत घरोघरी जाऊन टेमिफॉसचे द्रवण पाण्याच्या साठयामध्ये टाकण्यात आले होते, तसेच फॉगिंग मशीनने संपूर्ण शहरामध्ये धुर फवारणी करण्यात येते.

• शहरातील स्वच्छतेच्या अनुषंगाने पंढरपूर येथील सर्व्हे नं. १०० कंपोष्ट डेपो येथे ६ टन प्रतिदिन क्षमतेच्या ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करुन गॅस तयार करणारा बायोगॅस प्रकल्पाचे दुरुस्तीचे काम माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये पूर्ण झाले असून सदर बायोगॅस प्रकल्प पुन्हा सुरु करण्यात आला आहे.

• कासेगाव ग्रामपंचायत हद्दीतील कचरा डेपोमध्ये कचऱ्याचे विंड्रो कंपोष्टींग करुन अस्तित्वात असलेल्या कचऱ्यापासून खत निर्मिती सुरु केली आहे.

• सद्यस्थितीत पंढरपूर शहरात दैनंदिन निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करुन बायोगॅस निर्माण करण्यात येत असून प्लास्टिक, धातू, कागद इत्यादी स्वरुपातील सुका कचरा हा कचरावेचकामार्फत पुनर्वापराकरिता पाठविण्यात येतो. तसेच नगरपरिषदेकडून गोळा करण्यात येणाऱ्या कचऱ्याचे ९० % विलगीकरण करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) शहरातील श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर परिसरात २ वर्षापूर्वी बसविलेले पेव्हींग ब्लॉक निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(२७) १११२१४ (१२-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) शहरातील श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर परिसरात २ वर्षापूर्वी बसविलेले पेव्हींग ब्लॉक निकृष्ट असून ते खराब झाल्यामुळे जागोजागी खड्डे पडले आहेत व त्यामुळे नागरिकांची प्रचंड गैरसोय होत असल्याचे दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपालिका प्रशासनाने संबंधित ठेकेदाराला सदरील कामाचे देखभाल दुरूस्ती कालावधी संपला नसल्यामुळे खराब झालेली कामे तातडीने दुरूस्ती करण्याबाबत आदेश देणे गरजेचे असतांनाही याबाबत अद्यापी कोणतीच कार्यवाही होत नसल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारे बेकायदा काम करणाऱ्या कंत्राटदार व यामध्ये सहभागी असणारे नगरपालिका प्रशासन यांचे अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०१८) :** (१) व (२) • पेव्हींग ब्लॉक बसविण्याची कामे दिनांक १२ सप्टेंबर, २०१४ रोजी सुधारित आराखडयाअंतर्गत नियोजन विभागाने मंजूर केली होती. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ही कामे करण्यात आली.

• दिनांक १६ डिसेंबर, २०१७ रोजी ही कामे पंढरपूर नगरपरिषदेस वर्ग करण्यात आली.

• पेव्हींग ब्लॉक सुस्थितीत असल्याचे दिनांक २८ जून, २०१८ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल्या पाहणीत आढळून आले.

काही ठिकाणी चेंबर दुरुस्ती अथवा पिण्याच्या पाईपलाईनची दुरुस्ती यामुळे पेव्हींग ब्लॉकची पातळी डिस्टर्ब झाली आहे, ही कामे ठेकेदाराकडून दुरुस्त करुन घेण्यात येत आहेत, असे सार्वजनिक बांधकाम विभागाने कळविले आहे.

• सदर काम दिनांक ३० ऑक्टोबर, २०१७ रोजी पूर्ण झाले असून या दिनांकापासून पुढील ३ वर्षे ठेकेदाराने देखभाल व दुरुस्ती विनामुल्य करावयाची आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई क्षेत्रातील कन्स्ट्रक्शन कंपनीस सिडको प्राधिकरणाने भुखंड दिल्याबाबत**

**(२८) ११५५६१ (१२-०४-२०१८). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) क्षेत्रातील इराईसा कन्स्टक्शन्स कंपनीस व नवी मुंबई क्षेत्रातील इनॉरबिट मॉल व मेस्त्रि कन्स्ट्रक्शन कंपनीस सिडको प्राधिकरणाने भुखंड दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकूण किती व कोणत्या प्रयोजनासाठी भुखंड दिले आहेत तसेच भुखंडाचे एकूण क्षेत्रफळ किती चौरस मिटर आहे,

(३) असल्यास, सिडकोने शेतक-यांकडून १२.५० टक्के योजनेंतर्गत घेतलेल्या सदर भुखंडाचे वाटप करित असताना अनियमितता आणि कायद्याचे उल्लंघन झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानूसार संबंधित दोषी अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-१०-२०१८) :** (१) व (२) होय.

मौजे वाघिवली येथील नवी मुंबई प्रकल्पासाठी श्री.जुगलकिशोर हनुमानबक्ष मुंदरा व इतर यांच्या संपादित करण्यात आलेल्या जमिनीपोटी त्यांना १२.५ टक्के योजनेअंतर्गत सीबीडी-बेलापूर येथील सेक्टर ३०-३१ मध्ये सिडकोमार्फत ५३२०० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड वाटप करण्यात आला होता.सदर भूखंडाबाबत वाटपदाराने केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने वाटपदार, सिडको व विकासक यांच्या दरम्यान त्रिपक्षीय करार (Tripartite Agreement) दि.११.०९.२००८ व दि.०४.०५.२००९ रोजी करण्यात आले. सदर भूखंड वाटपदाराने मागितलेल्या परवानगीनुसार मे. ईराइसा डेव्हलपर्स प्रा.लि. यांचे नावे नियमानुसार पूर्व परवानगी ने हस्तांतरीत केला आहे.

तर, इनऑरबिट मॉल साठी वाशी नोडमधील सेक्टर ३०ए येथील ३०६२१.३५ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड रहिवास तथा वाणिज्यिक प्रयोजनार्थ वाटप करण्यात आला आहे.

मेस्त्री कन्स्ट्रक्शन कंपनीस नेरुळ, से-६० येथील अंदाजे ३५.५० हे.आर. जमीन अत्याधुनिक गोल्फकोर्स आणि रिअल इस्टेट करण्याकरिता वाटप करण्यात आलेली आहे.

(३) अशी बाब नाही.

इनऑरबिट मॉल व मेस्त्री कन्स्ट्रक्शन कंपनीस सिडको प्राधिकरणाने साडेबारा टक्के योजनेंतर्गत कोणताही भूखंड दिलेला नाही.

तथापि, मे. इराईसा डेव्हलपर्स या कंपनीला श्री.जुगलकिशोर हनुमानबक्ष मुंदरा व इतर यांच्या संपादित करण्यात आलेल्या जमिनीपोटी त्यांना १२.५ टक्के योजनेअंतर्गत सीबीडी-बेलापूर येथील सेक्टर ३०-३१ मध्ये सिडकोमार्फत ५३२०० चौ.मी. नियमानुसार भूखंड वाटप करण्यात आला आहे.

सदर १२.५% योजने अंतर्गतच्या भूखंडवाटपासंदर्भात झालेल्या तक्रारी व विधीमंडळात उपस्थित झालेल्या बाबींवरुन सिडकोमार्फत वाटपदार व विकासक यांना भूखंड रद्द का करण्यात येवू नये, याबाबत माहे ऑक्टोबर,२०१४ मध्ये कारणे दाखवा नोटीस दिली होती. सदरहू नोटीसीविरोधात विकासकाने मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.९२१२/२०१४ दाखल केली आहे. सदर रिट याचिकेमधील सिव्हील ॲप्लिकेशन क्र.२११४१/२०१८ मध्ये शासनाच्या वतीने दि.२८.०८.२०१८ रोजी शपथपत्र दाखल करण्यात आले असून सदर बाब न्यायप्रविष्ट आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वांद्रे (मुंबई) येथील महानगरपालिकेच्या भाभा रुग्णालयातील अनागोंदी कारभाराबाबत**

**(२९) ११६०५६ (१२-०४-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (मुंबई) येथील महानगरपालिकेच्या भाभा रुग्णालयातील बेजबाबदार कारभारामुळे सर्वसामान्य रुग्णांना आरोग्य सुविधा मिळत नसल्याच्या तक्रारी वांरवार प्रशासनाकडे करूनही दखल घेण्यात येत नसल्याने आंदोलन करण्याचा इशारा स्थानिक मुस्लीम महिला आणि रुग्णालयाच्या दक्षता समितीने दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, तद्नुसार सदर रुग्णालयातील रुग्ण सेवेचा दर्जा सुधारण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१८) :** (१) “भाभा हॉस्पिटलमध्ये योग्य ती सोय नाही” अशा आशयाची तक्रार भारतीय मुस्लीम महिला आंदोलन यांनी दिनांक २६.१२.२०१६ व दिनांक ०३.०४.२०१७ रोजी भाभा रुग्णालयास दिली होती.

सदर तक्रारींच्या अनुषंगाने आंदोलन करण्याबाबत दिनांक १७.०२.२०१८ रोजीच्या नवभारत टाईम्स या वर्तमानपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती.

(२) सदर तक्रारींमध्ये उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पूर्तता करण्यात आली असून, सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

सदर रुग्णालयातील रुग्ण सेवेचा दर्जा सुधारण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे:-

• सदर रुग्णालयात सद्य:स्थितीत वैद्यकशास्त्र, बालरोग, आय.पी.सी.यु.पी.यू., शल्यक्रिया, अस्थिव्यंग, स्त्रीरोग व प्रसुतीकक्ष, त्वचा रोग, कान, नाक, घसा, नेत्ररोग, आय.सी.यु, ट्रॉमा असे विविध विभाग रुग्णांसाठी सुरु आहेत.

• या सर्व विभागांचे बाह्यरुग्ण विभाग सुरु आहेत.

• २४ तास अपघात विभाग, १३ रुग्णशय्यचे आय.पी.सी.यु., १४ रुग्णशय्येचे पी.यू., सी.टी. स्कॅन सुविधा, रक्तपेढी, निदान सुविधा, ३ पाळ्यांमध्ये क्ष-किरण तपासणी, ३ पाळ्यांमध्ये रक्त तपासणी, २४ तास सोनोग्राफी व इतर सहाय्यक सेवा सुविधा, २४ तास रुग्णवाहिका, ३ पाळ्यांमध्ये शववाहिनी सेवा, २४ शवांची क्षमता असलेले शवागृह इत्यादी सेवा सुरळीतपणे उपलब्ध करुन देण्यात येतात.

• गरीब रुग्णास शस्त्रक्रिया करणे गरजेचे असल्यास तसेच औषधांची आवश्यकता भासल्यास, त्यास रुग्णालयातील धर्मादाय निधीतून मदत करण्यात येते.

• सदर रुग्णालयाचे विस्तारीकरण प्रस्तावित असून, त्यामध्ये एम.आर.आय., सी.टी. स्कॅन, युरोलॉजी, कार्डीओलॉजी, डायलिसीस, सी.व्ही.टी.एस. या अद्ययावत सेवा-सुविधा रुग्णांना पुरविण्यात येणार आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माहीम (मुंबई) येथील हिंदुजा रुग्णालयाच्या बाजूला असलेल्या स्टेट्स हॉटेलकडून होत असलेल्या वीज चोरीबाबत

**(३०) ११६३६४ (१२-०४-२०१८). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहीम (मुंबई) येथील हिंदुजा रुग्णालयाच्या बाजूला असलेल्या स्टेट्स रेस्टॉरंटची बेस्टच्या दक्षता विभागाने पाहणी केली असता गत दहावर्षांपासून या रेस्टॉरंटमध्ये विजेची चोरी होत असल्याने चार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कमेची वीज चोरी झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेस्टच्या दक्षता विभागाने सदर रेस्टॉरंटचे मालक श्री. शेखर नारायण शेट्टी यांच्याविरुद्ध माहीम पोलिस ठाण्यात तक्रार केल्यानंतर पोलीसांनी शेट्टी यांच्याविरुद्ध एफ.आय.आर नोंदणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर वीज चोरी प्रकरणी स्टेट्स रेस्टॉरंटचे मालक श्री. शेखर नारायण शेट्टी यांच्या विरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) माहिम (मुंबई) येथील स्टेटस रेस्टॉरंटची बेस्टच्या दक्षता विभागाने पाहणी केली असता सदर ठिकाणी दहा वर्षांपासून वीज चोरी होत असल्याचे बेस्टच्या निदर्शनास आले.

बेस्ट उपक्रमाने सदर वीज चोरी प्रकरणी रु. ४.५५ कोटी इतक्या रकमेचा प्राथमिक दावा केला आहे.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी माहिम पोलीस ठाणे येथे एफ.आय.आर. क्रमांक १६/२०१७, दिनांक २०.०४.२०१७ भारतीय विद्युत कायदा २००३ कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरण मा.सत्र न्यायालय, मुंबई येथील न्यायालय क्रमांक ३४ येथे न्यायप्रविष्ठ आहे.

---

## ठाणे शहरातील रेतीबंदर चौपाटी आणि रस्ता रुंदीकरणात बाधीत झालेल्या झाडांची अटलांटा कंपनीकडून कत्तल करण्यात येत असल्याबाबत

**(३१) ११६५५९ (०३-०८-२०१८). श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील रेतीबंदर चौपाटी आणि रस्ता रुंदीकरणात बाधीत झालेल्या, पुन:रोपण केलेल्या झाडांचे अटलांटा कंपनीकडून नियम डावलून कत्तल करण्यात येत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित विकासकावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

ठाणे शहरातील रेतीबंदर चौपाटी आणि रस्ता रुंदीकरणात बाधित झालेल्या झाडांचे पुन:रोपित झाडे अटलांटा कपनीने तोडली नाहीत, असे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सार्वजनिक प्रकल्पांमध्ये बाधित होणा-या व्यक्तिंचे पुनर्वसन करण्याऐवजी एकरक्कमी रोख रक्कम देण्याच्या प्रस्तावाबाबत

**(३२) ११६७२० (२३-०७-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विविध ठिकाणी विशेषतः महानगरपालिका, नगरपालिकांच्या क्षेत्रात राबविण्यात येणा-या सार्वजनिक प्रकल्पांमध्ये बाधित होणा-या व्यक्तिंचे पुनर्वसन करण्याऐवजी त्यांना नुकसान भरपाईपाटी एकरक्कमी रोख रक्कम देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावात कोणकोणत्या सार्वजनिक प्रकल्पांचा समावेश आहे,
(३) असल्यास, विचाराधीन प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने निर्णय घेतला आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१८) :**(१), (२), (३) व (४) नागरी भागात, केंद्र किंवा राज्य शासनाच्या निकडीच्या प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या शासकीय जमीनीवर अतिक्रमण असल्यास आणि असे अतिक्रमणधारक शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या निकषानुसार संरक्षणास पात्र असल्यास, त्यांना निष्कासित करताना, अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबत मा.मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार अशा मार्गदर्शक सूचना शासन निर्णय, नगरविकास विभाग, क्र.चंमपा-२०१७/प्र.क्र.२३/नवि-२६ दिनांक १३ जून, २०१८ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

---

## नायर रुग्णालयातील (मुंबई) निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांची पोषणयुक्त न्याहरी योजना बंद असल्याबाबत

**(३३) ११७१९७ (२९-०७-२०१८). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या अधिनस्त नायर रुग्णालयातील निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांची पोषण युक्त न्याहरी योजना माहे सप्टेंबर-२०१७ पासुन बंद असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ई-निवीदा प्राप्त न झाल्याने सदर न्याहरी योजना बंद झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी मुंबई महानगरपालिकेने उच्च दराने निविदा मागविण्यास हलचाली केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१८) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नायर रुग्णालयामधील निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांकरीता असलेली "पोषणयुक्त न्याहारी योजना" माहे ऑक्टोबर, २०१७ ते एप्रिल, २०१८ या कालावधीत ठेकेदाराकडून तांत्रिक बाबींची पुर्तता न झाल्यामुळे बंद होती.
(२) सदर योजना कार्यान्वित करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत मागविण्यात आलेल्या ई-निविदांना प्रतिसाद मिळाला नाही ही वस्तुस्थिती आहे.
(३) व (४) सदर योजना कार्यान्वित राहण्यासाठी सद्य:स्थितीत नायर रुग्णालयातील उपहारगृहास सेवा पुरविणाऱ्या कंत्राटदाराकडून निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांकरीता "पोषणयुक्त न्याहारी योजना" अंतर्गत दिनांक २३.०४.२०१८ पासून न्याहरीचा पुरवठा करण्यात येत आहे.

---

**भिवंडी (जि.ठाणे) महानगरपालिकेतील नालेसफाईसाठी निविदा ३ वेळा काढूनही ठेकेदारांनी निविदेकडे दुर्लक्ष केल्याबाबत**

**(३४) ११७६२२ (२३-०७-२०१८). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) महानगरपालिकेतील नालेसफाईसाठी १ कोटी २० लाख रुपयांच्या निविदा ३ वेळा काढून ही ठेकेदारांनी निविदेकडे दुर्लक्ष केल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदशर्नास आले तद्नुसार तीन वेळा निविदा प्रक्रियेस प्रतिसाद न मिळण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१०-२०१८) :** (१) व (२) भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने नाले व गटार सफाईसाठी तीन वेळा निविदा प्रसिध्द केली होती. तथापि, सदर निविदेस प्रतिसाद मिळाला नाही.

सद्य:स्थितीमध्ये भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका क्षेत्रातील नाले व गटार सफाईचे काम विना निविदा भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका स्तरावरुन करण्यात येत असल्याचे आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**मुरबाड (जि.ठाणे) येथील व्यावसायिकांकडून कोटयवधी रुपये घेऊन स्वतःच बांधलेले २६३ गाळे नगरपंचायतीने बेकायदा ठरविल्याबाबत**

**(३५) ११८०३७ (२८-०७-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) येथील व्यावसायिकांकडून कोटयवधी रुपये घेऊन स्वतःच बांधलेले २६३ गाळे नगरपंचायतीने माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान बेकायदा ठरविले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१८) :** (१) व (२) मुरबाड शहरातील मुख्य बाजारपेठ रस्त्यावर दुतर्फा असणाऱ्या ४० वर्षा पुर्वीपासूनच्या अंदाजीत २०० टपरी धारकांना रस्ता रुंदीकरणाच्या कामादरम्यान नगरपंचायतीमार्फत नोटीसा बजाविण्यात आल्या होत्या. रस्ता रुंदीकरणानंतर टपरीधारकांनी रस्ता सोडून उर्वरित जागेत या टपऱ्यांची पुर्नरचना करुन बांधकाम केले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

संबंधित टपरीधारकांनी विनापरवानगी टपऱ्यांची पुर्नरचना केल्याने मुरबाड नगरपंचायतीद्वारे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये कार्यवाही सुरु केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवीन पनवेल, खारघर, कळंबोली, कामोठे या सिडको वसाहतीतील सांडपाणी पुनर्वापर आराखडयाच्या अंमलबजावणीबाबत**

**(३६) १२१०३४ (२१-०६-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवीन पनवेल, खारघर, कळंबोली, कामोठे या सिडको वसाहतीतील सांडपाण्यावर प्रक्रिया करणाऱ्या चार मलनि:सारण केंद्रातून बाहेर पडणा-या सांडपाण्याचा वापर करण्याकरीता सिडकोने.तयार केलेला २२० कोटी रूपयांच्या आरखडयाची अंमलबजावणी न झाल्यामुळे हजारो लिटर पाणी खाडीत सोडले जात असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त सिडको वसाहतीतील वाढती लोकसंख्या व पाण्याची मागणी लक्षात घेता मलनि:सारण केंद्रातून प्रक्रिया केलेल्या पाण्याचा उद्याने, बांधकाम, कारखाने आदी ठिकाणी वापर केल्यास लाखो लिटर पाण्याची बचत होऊ शकते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून मलनि:सारण केंद्रातून प्रक्रीया केलेल्या पाण्याचा वापर करण्याकरीता सिडको लि. यांनी तयार केलेल्या २२० कोटी रूपयांच्या आराखडयाची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१८) :** (१), (२) व (३) सिडको वसाहतींतील सांडपाणी भूमिगत मल:निस्सारण वाहिन्यांमार्फत एकत्र करुन त्यावर केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या नवीन मानकांनुसार प्रक्रिया करुन त्यातील मल व प्रवाह (पाणी) वेगळे करून ते पाणी बिगर पिण्याच्या वापरासाठी अथवा नदी, नाले व खाडी या नैसर्गिक प्रवाहांमध्ये विसर्जित करण्यात येते.

सिडकोमार्फत खारघरमध्ये मलनिःसारण केंद्रातून प्रक्रिया करून उपलब्ध होणारे पाणी गोल्फ कोर्स, सेंट्रल पार्क उद्यानासाठी वापरण्यात येत आहे. सिडको वसाहतींमध्ये कार्यान्वित असलेल्या मल:निस्सारण केंद्रांतील सांडपाण्याचा पुनर्वापर करण्याकरीता सिडकोने ऑक्टोबर, २०१६ मध्ये नेमलेल्या सल्लागाराने सांडपाण्याच्या पुनर्वापराचे सर्व्हेक्षण करुन रु.१९२.५७ कोटींचा तांत्रिक व आर्थिक अहवाल सादर केला होता. तथापि, सदर प्रकल्प आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य नसल्यामुळे तो सिडकोमार्फत हाती घेण्यात आला नाही.

उक्त संदर्भीत क्षेत्र जसे नवीन पनवेल, कळंबोली, खारघर व कामोठे दि.२६/०९/२०१६ च्या शासन निर्णयानुसार दि.०१/१०/२०१६ पासुन पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये अंतर्भूत झालेली आहे. त्यामुळे या क्षेत्रातील आवश्यक व्यवहार्य उपभोक्त्यास प्रोत्साहनपर अनुदान व इतर सवलत देणे ह्या बाबतचा निर्णय पनवेल महानगपालिकेच्या कार्यक्षेत्रात येतो. तसेच त्यानुसार उपभोक्त्यास अशा प्रकारच्या दिलेल्या सेवेची वसुली करण्याचा अधिकार पनवेल महानगरपालिकेस आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी-निजामपूर (जि.ठाणे) महानगरपालिका हद्दीतील मौजे कामतघर येथील सर्व्हे नं.१०३ मध्ये असलेले गाळे तोडल्याबाबत**

**(३७) १२१३०२ (२९-०७-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी-निजामपूर (जि.ठाणे) महानगरपालिका हद्दीतील मौजे कामतघर येथील सर्व्हे नं. १०३ मध्ये असलेले गाळे तोडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रभाग समिती क्र. ३ मधील सर्व्हे नं. १५८/१ पै काही बांधकाम भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका मंजुर विकास आरखडयानुसार असतानाही या सर्व्हे नंबर मध्ये एका बिल्डरसाठी रस्ता करण्यासाठी सर्व्हे नंबर १०३ मधील गाळेधारकांना नोटीस बजावून सदर बांधकाम निष्कासित करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनूसार पूढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१८) :** (१), (२) व (३) भिवंडी महानगरपालिकेने दिनांक ११.०१.२०१८ रोजी महानगरपालिकेतर्फे मौजे-कामतघर सं.नं. १०३ मधील ४ गाळे निष्कासित केले परंतु गाळे धारकांना देण्यात आलेल्या नोटीसमध्ये सर्व्हे क्र. १०३ ऐवजी सर्वे क्र. १५८/१ नमुद करण्यात आले असल्याचे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांनी कळविले आहे.
उपरोक्त प्रकरणी अनियमितता झाली आहे किंवा कसे, याबाबत भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका स्तरावर चौकशी करण्यात येत असून चौकशीत दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात येणार असल्याचे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सैनिकांच्या वारसांना तसेच सीमा सुरक्षाबल व इतर तत्सम निम लष्करी दलातील सदस्य व त्यांच्या कुटुंबियांना देण्यात येणा-या अनुदानात वाढ करण्याबाबत**

**(३८) १२१७९७ (२८-०७-२०१८). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) युध्दात युध्दजन्य परिस्थितीमध्ये तसेच देशातील सुरक्षासंबंधी मोहिमेत, चकमकीत, देशाबाहेरील मोहिमेत धारातीर्थी पडलेल्या राज्यातील सैनिकांच्या वारसांना तसेच सीमा सुरक्षाबल व इतर तत्सम निम लष्करी दलातील सदस्य व त्यांच्या कुटुंबियांना देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे व तद्नुसार अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१८) :** (१) व (२) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक मासैम २०१७/(प्र.क्र.३१०)/२०१७/२८, दिनांक २७ मार्च, २०१८ अन्वये युध्दात युध्दजन्य परिस्थितीमध्ये तसेच देशातील सुरक्षासंबंधी मोहिमेत, चकमकीत, देशाबाहेरील मोहिमेत धारातीर्थी पडलेल्या राज्यातील सैनिकांच्या /सिमा सुरक्षाबल व इतर तत्सम निम लष्करी दलातील जवानांच्या विधवा/ अवलंबितांना यापूर्वी देण्यात येणाऱ्या रुपये ८.०० लाख ते १०.००लाख इतक्या एकरकमी आर्थिक सहाय्य /अनुदानात वाढ करुन सदर अनुदान रुपये २५.०० लाख इतके करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. दिनांक १ जानेवारी,२०१८ पासून सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरातील अनधिकृत बांधकामांची यादी सर्व्हे क्रमांकासह दुय्यम निबंधकांना देण्याबाबत**

**(३९) १२२३१९ (२५-०७-२०१८). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने अनधिकृत बांधकाम असतांनाही याबाबतची माहिती लपवून ठेवून अशा मालमत्तांची विक्री करुन नागरीकांची फसवणूक करण्याच्या वाढत्या प्रमा ास आळा घालण्यासाठी राज्यातील नियोजन प्राधिकरणाने आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या हद्दीतील प्रभागनिहाय अधिकृत आणि अनधिकृत बांधकामांची यादी सर्व्हे क्रमांक व विकासकांच्या नावासह संकेतस्थळ तसेच वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन ही माहिती दुय्यम निबंधकांना द्यावी असा आदेश नगरविकास विभागाने माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान काढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशाच्या अनुषंगाने नाशिक शहरामध्ये तसेच नियोजन प्राधिकरणाच्या हद्दीसह नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीतील किती अनधिकृत बांधकामांची सर्व्हे क्रमांकासह यादी दुय्यम निबंधकांना देण्यात आली आहे,
(३) असल्यास, नाशिक महानगरपालिकेत सदर माहिती सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३० मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाच्या निर्णयात्मक आदेशाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१०-२०१८) :** (१) होय.
(२), (३) व (४) शासन परिपत्रक, दिनांक ०३/०५/२०१८ अन्वये दिलेल्या सूचनांनुसार, नाशिक महानगरपालिकेने तात्काळ कार्यवाही करुन आवश्यक ती माहिती दुय्यम निबंधक कार्यालयास सादर करावी, अशा सूचना नाशिक महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईत व राज्यात फेरीवाला धोरण राबविण्याबाबत

**(४०) १२२४५२ (२६-०७-२०१८). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेने रेल्वे स्थानक व गर्दीच्या परिसरातील फेरीवाले हटविण्यासाठी धडाकेबाज मोहिम सुरु केली परंतू काही महिने स्थानकांबाहेरचा परिसर फेरीवालामुक्त झाला मात्र पाच महिन्यांनंतर पुन्हा दादर, विलेपार्ले, कुर्ला, गोरगांव, बोरिवली, सीएसटी परिसरात फेरीवाल्यांनी अतिक्रमण केल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील सर्व महापालिका आणि नगरपालिका क्षेत्रात फेरीवाला धोरणाची तातडीने अंमलबजावणी करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने चार वर्षापूर्वी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईत व राज्यात फेरीवाला धोरण आखण्यात येणार असल्याचे शासनाने जाहिर केले होते परंतू त्यांची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, फेरीवाला धोरण राबविण्यात न येण्यामागील कारणे काय आहेत तसेच सदर धोरण केव्हापर्यंत राबविण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१८) :** (१) "फेरीवाल्यांचे पुन्हा बस्तान" अशा आशयाची बातमी दिनांक १६.०३.२०१८ रोजीच्या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक ६५२/२०१७ मध्ये दिनांक ०१.११.२०१७ रोजी दिलेल्या आदेशानुसार, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सर्व रेल्वे स्थानकांपासून १५० मीटर अंतरापर्यंत "ना-फेरीवाला क्षेत्र" असे फलक लावण्यात आले आहेत.

तथापि काही प्रमाणात फेरिवाल्यांचा या परिसरात वावर असतो. यास्तव महानगरपालिकेच्या २४ विभागांत दोन सत्रांमध्ये फेरीवाल्यांवर निष्कासनाची कारवाई करण्यात येते.

(२), (३) व (४) केंद्र शासनाने पदपथ विक्रेते (उपजीविका संरक्षण आणि पदपथावरील विक्रीचे विनियमन) अधिनियम, २०१४ लागू केलेला असून राज्य शासनाने, महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण आणि पदपथावरील विक्रीचे विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी प्रसिध्द केलेले आहेत.

तद्नंतर सदर अधिनियमातील कलम ३८(१) मधील तरतुदीनुसार राज्य शासनाने पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियम) (महाराष्ट्र) योजना, २०१७ दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी योजना प्रसिध्द केली आहे. यानुषंगाने फेरीवाला धोरणाच्या अंमलबजावणीची कार्यवाही स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत करण्यात येत आहे.

मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार, रेल्वे स्थानकाबाहेर १५० मीटरच्या अंतरापर्यंत पदपथ व रस्ते मोकळे ठेवण्याबाबत राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील अनेक सोसायटया आणि व्यावसायिक इमारती अग्निशमन यंत्रणा बसविण्यास टाळाटाळ करीत असल्याबाबत**

**(४१) १२२४६८ (२६-०७-२०१८). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत आगी लागण्याचा घटनांमध्ये वाढत होत असताना मुंबईतील अनेक सोसायटया आणि व्यावसायिक इमारती अग्निशमन यंत्रणा बसविण्यास टाळाटाळ करीत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अग्निशमन यंत्रणा न बसविणा-या सोसायटया व व्यावसायिक इमारतींवर कारवाई करण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१८) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलामार्फत यादृच्छिकरित्या (Randomly) करण्यात आलेल्या तपासणीमध्ये काही इमारती व सोसायट्या

या, बसविण्यात आलेल्या अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत ठेवण्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे ही वस्तुस्थिती आहे.

(२) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ मधील तरतूदीनुसार सोसायटी अथवा व्यावसायीक इमारतींमध्ये संबंधित इमारतीच्या मालक/भोगवटादार यांनी अग्निशमन यंत्रणा बसविणे व ती सुस्थितीत ठेवणे आवश्यक आहे.

सदर नियमातील तरतुदीनुसार इमारतींमध्ये बसविण्यात आलेली अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत असल्याबाबतचा अहवाल फॉर्म-बी स्वरुपात संबंधित मालक/भोगवटादार यांनी प्रत्येक वर्षी माहे जानेवारी व जुलै मध्ये संबंधित अग्निशमन कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.

उपरोक्त बाबींची पुर्तता न केल्यास किंवा टाळाटाळ केल्यास अशा मालक/भोगवटादार यांचेवर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ अन्वये महानगरपालिकेमार्फत कारवाई करण्यात येते.

तसेच सोसायटी, व्यावसायिक इमारती यांचे मालक/ भोगवटादार यांना अग्निसुरक्षेचे महत्व समजविण्यासाठी महानगरपालिकेच्या अग्निशमन दलामार्फत जागृती मोहिम घेण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई (जि.पालघर) तालुक्यातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याबाबत**

**(४२) १२२८०९ (२९-०७-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसईतील पेल्हार येथे स.नं.१४१, १७६, १७९ तुळींज येथील स.नं.५५ अ/२ अ, ५५ अ/२ ब, ५५ २ ब व ५५/७ या ग्रामदेवी देवस्थान इनामवर्ग-३ ४५ गुंठे जागेवर शाळा, हॉटेल, सात मजली टॉवरचे तसेच वालीव विभाग येथील तलाठी सजा कामण, देवदल येथे स.नं. ४०, हि.नं.२, स.नं. ४१ हि.नं.१ व स.नं. ६७ या जागांवर अनधिकृत बांधकाम झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चोकशीनूसार उक्त अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) वसई विरार शहर महानगरपालिकेने खालीलप्रमाणे कळविले आहे:-

पेल्हार येथे स.नं.१४१,१७६,१७९ या मिळकती मधील अनधिकृत बांधकाम हे सन २००६ मध्ये तत्कालीन ग्रामपंचायत पेल्हार यांच्या कार्यकाळात झाले असून सदर बांधकामास दिनांक २१.०३.२०१२ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार नोटीस बजावण्यात आलेली आहे.

उक्त सर्वे नंबर मधील जागेचा वाद हा न्यायप्रविष्ट असल्याने मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्यात येणार असल्याचे वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

तुळींज येथे स.नं.५५ अ/२ अ,५५ अ/२ ब,५५ २ ब, व ५५/७ या ग्रामदेवी देवस्थान इनाम वर्ग-३, ४५ गुंठे जागेवरील कृष्णा मोरु पाटील देशमुख शैक्षणिक संस्था या शाळेस जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक २०.०९.१९८९ रोजी जमीन बिनशेती व तत्कालिन तुळींज ग्रामपंचायतीने दिनांक १८.०१.१९९० रोजी बांधकामाचा दाखला दिला आहे.

तसेच सदरच्या सर्वे नंबर मध्ये साई किरण या सात मजली इमारतीस तत्कालीन सिडको प्राधिकरणाने इमारत पुर्णत्वाचा दाखला दिनांक १६.१०.१९९८ रोजी दिला.

या इमारतीतील तळ मजल्यावर उत्सव हॉटेलमध्ये अनधिकृत पत्राशेडचे सन २००६ मध्ये बांधकाम केले असुन त्यास तत्कालीन नालासोपारा नगरपरिषदेने कर आकारणी केली आहे व सदर गाळे धारकास वसई विरार शहर महानगरपालिकेने नोटीस दिली आहे.

वालीव विभाग येथील तलाठी सजा कामण, देवदळ येथे स.नं.४०, हि.नं.२, स.नं.४१ हि.नं.१ व स.नं.६७ या जागेवर ६६ गाळयांचे अनधिकृत बांधकाम झाले असून सदर बांधकामास दिनांक ३०.०१.२०१६ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत नोटीस बजावण्यात आली असुन या प्रकरणी एक महिन्यात सबंधितांवर गुन्हे दाखल करण्याच्या सूचना आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर महानगरपालिका अंतर्गत के.एम.टी. च्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या ग्रॅच्युअटी व इतर देय रक्कमेबाबत

**(४३) १२३३८५ (३०-०७-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर महानगरपालिका अंतर्गत के.एम.टी विभागाकडे कायम लिपिक, ड्रायव्हर, कंडक्टर म्हणून काम करीत असलेले सुमारे १५० कर्मचारी सेवेतून निवृत्त झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कर्मचारी गत ६ वर्षे सेवानिवृत्ती होऊन देखील त्यांना ग्रॅच्युइटी, प्रॉव्हीडंड फंड व इतर देय रक्कम प्रशासनाकडून अद्याप मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची हक्काची रक्कम मिळवून देणेबाबत शासनाकडून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१८) :** (१) कोल्हापूर महानगरपालिका अंतर्गत के.एम.टी. उपक्रमाच्या सेवेतून सुमारे १५० विविध पदावरील कर्मचारी निवृत्त झाले आहेत, हे खरे आहे.
(२) के.एम.टी. परिवहन उपक्रमाच्या सेवा निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना ग्रॅच्युइटी व इतर देय

रक्कमा टप्प्या टप्प्याने अदा करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.
(३) के.एम.टी. परिवहन उपक्रमाचा दैनंदीन खर्च व त्या तुलनेत महसुली उत्पन्न लक्षात घेता होणारी तुट भरुन काढण्यासाठी महानगरपालिकेच्या चालु आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पाद्वारे तरतुद करण्यात आली असून त्यातून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे देय रक्कमांचे वितरण केले जाणार असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाडा तालुक्यात (जि.पालघर) पर्यायी अग्नीशमन दलाची व्यवस्था करण्याबाबत**

**(४४) १२३६०३ (२५-०७-२०१८). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा तालुक्यातील (जि.पालघर) आबिटघर येथे असलेल्या सनशाईन या पुठ्ठ्याचे उत्पादन करणाऱ्या कंपनीत दिनांक १० मे, २०१८ रोजी वा तया सुमारास पुन:श्च आग लागली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाडा तालुक्यात सुमारे एक हजारांवर कारखाने असूनदेखील या ठिकाणी अग्नीशमन दल नसल्यामुळे वसई, पालघर, भिवंडी व विरार येथून अग्निशमन दलाची मदत घ्यावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत वाडा तालुक्यात पर्यायी अग्नीशमन दलाची व्यवस्था करण्यात येणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१८) :** (१) आबिटघर येथे अशा प्रकारच्या आगीची घटना घडली, ही वस्तुस्थिती आहे.
(२) व (३) अग्निप्रतिबंधक उपाययोजनेसाठी नगरपंचायतीच्या लगतच्या इतर नगरपरिषदां व महानगरपालिकांच्या अग्निशमन दलाची मदत घेण्यात येते, असे नगरपंचायतीने कळविले आहे.
• वाडा नगरपंचायत ही नवनिर्मित नगरपंचायत असून अग्निप्रतिबंधक यंत्रणा, सुसज्ज अग्निशमन दल तयार करणे इत्यादीबाबत कार्यवाही सूरु असल्याचे नगरपंचायतीने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिपळूण शहरामधील (जि.रत्नागिरी) एलईडी दिवे बसविण्याच्या कामातील गैरव्यवहाराबाबत**

**(४५) १२४११० (३०-०७-२०१८). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण शहरामधील (जि.रत्नागिरी) एल ई डी दिवे बसविण्याच्या कामाबाबत तक्रारी

प्राप्त झालेल्या असून जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी सदर कामाची त्रयस्थ पक्षातर्फे तपासणी करण्याच्या सूचना दिलेल्या असतानांही काम पूर्ण होण्यापूर्वीच संबधीत ठेकेदाराला उर्वरीत सर्व देयक व अनामत रक्कमही अदा करण्यात आली असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी सदर प्रकरणी चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तदनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीनूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१८) :** (१) अशा आशयाच्या तक्रारी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडे प्राप्त झाल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

दरम्यान चिपळूण नगरपरिषदेमार्फत नेमलेल्या तांत्रिक सल्लागाराच्या अहवालानुसार एल.ई.डी. बसविण्याच्या कामासाठी संबंधित ठेकेदारास झालेल्या कामाची बिले अदा केल्याचे चिपळूण नगरपरिषदेने कळविले आहे.

(२) व (३) चिपळूण नगरपरिषदेत हाती घेण्यात आलेल्या एल.ई.डी. बसविण्याच्या कामासंदर्भात लोकप्रतिनिधी व नागरिकांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडून प्राप्त चौकशी अहवालावर नियमानुसार कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंबुखडी शिंगणापूर (कोल्हापूर) येथील पंपिंग हाऊसशेजारील पाईपलाईनला मोठी गळती होऊन हजारो लिटर पाणी वाया जात असल्याबाबत

**(४६) १२४४६८ (३०-०७-२०१८). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या चंबुखडी शिंगणापूर येथील पंपिंग हाऊसशेजारील पाईपलाईनला मोठी गळती होऊन दररोज हजारो लिटर पाणी वाया जात असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गळती होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, ही गळती रोखण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१८) :**(१) चंबुखडी शिंगणापूर येथील पंपिंग हाऊसशेजारील

पाईपलाईनला माहे मे, २०१८ च्या दरम्यान पाणी गळती झाल्याचे निदर्शनास आले, ही वस्तुस्थिती आहे.

(२) बलिंगा जलशुध्दीकरण केंद्रातून प्रक्रीया केलेले पाणी उच्च अश्वशक्तीच्या तीन पंपाद्वारे चंबुखडी येथील मोठ्या टाकीमध्ये घेऊन पुढे वितरीत करण्यात येते, याकरीता ८०० मी.मी. व्यासाची एक दाबनलीका वापरात असून त्यास अन्य एक दाबनलीका जोडण्यात आली आहे.

विद्युत पुरवठा खंडीत झाल्यामुळे तांत्रिक कारणास्तव या दाबनलीकेत वॉटर हॅमर निर्माण होऊन तेथे गळती निर्माण झाली, ही वस्तुस्थिती आहे.

(३) वॉटर हॅमरमुळे निर्माण झालेली गळती रोखण्याकरीता प्राथमिक स्तरावर वेल्डींग, डागडुजी करण्यात आली व तद्नंतर वेल्डींग करुन त्याठिकाणी कॉंक्रीट ब्लॉक टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई-विरार शहर महानगरपालिकेने शासनाकडे प्रलंबित असलेल्या अनुदानाच्या अनुशेषाची मागणी केल्याबाबत**

**(४७) १२४८८३ (३०-०७-२०१८). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिकेने शासनाकडे (प्रलंबित असलेल्या) विविध विकास कामांची अनुदानांचा अनुज्ञेय मिळण्याबाबत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विषयासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१७ मध्ये मा.मुख्यमंत्री यांना लेखी पत्र देऊन एकत्रित अनुदानाची रुपये ६५३७.२० लक्ष एवढी अपेक्षित असलेली रक्कम तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय;

(३) असल्यास, त्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१८) :** (१) व (२) मा.श्री.हितेंद्र ठाकूर, विधानसभा सदस्य यांनी वसई विरार शहर महानगरपालिकेस शासनाकडून देय असलेल्या रुपये ६५३७.२० लक्षची मागणी दिनांक २१.०५.२०१७ च्या पत्रान्वये केली आहे.

(३) व (४) उपरोक्त देय अनुदानापैकी रुपये २२६२.२० लक्ष इतके अनुदान महानगरपालिकेस प्राप्त झाले असल्याचे वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**वसई-विरार उपप्रदेशाचे वाढते औद्योगिकीकरण व नागरीकरण याकरिता सर्व समावेशक पायाभूत सुविधांचा बृहत आराखडा तयार करण्याबाबत**

**(४८) १२४८८५ (२६-०७-२०१८). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिकेने विशेष सर्वसाधारण सभा घेऊन वसई-विरार उपप्रदेशाचे वाढते औद्योगिकीकरण व नागरीकरण लक्षात घेता या विभागासाठी सर्व समावेशक असा पायाभूत सुविधांचा बृहत आराखडा (comprehensive infrastructure master plan) तयार करण्याबाबतचा ठराव पारीत करुन मा.मुख्यमंत्री माहोदय यांच्याकडे पाठविला असुन सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाची सद्यस्थिती काय आहे,

(३) असल्यास, शासनाने आतापर्यंत या प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१८) :** (१) वसई-विरार उपप्रदेशाचे सर्वसमावेशक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठीचा बृहत आराखडा comprehensive infrastructure master plan) जपान इंटरनॅशनल को-ओपरेशन एजन्सी (JICA) या संस्थेमार्फत त्यांच्या खर्चाने तयार करण्यास व कर्जनिधी उपलब्ध करुन देण्यास वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने दिनांक ०३.०३.२०१४ अन्वये मान्यता दिली आहे.

उक्त प्रस्ताव महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १०९ अन्वये मंजुरीसाठी शासनाकडे प्राप्त झाला आहे.

(२), (३) व (४) या प्रकरणी आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांचेकडून उक्त प्रस्तावाच्या आवश्यकतेसंदर्भात अधिक माहिती मागविण्यात आलेली आहे. माहिती प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**नाशिक महानगरपालिकेत नगररचना विभागात उपसंचालक पद रिक्त असल्याबाबत**

**(४९) १२४९१९ (३०-०७-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेच्या नगररचना विभागात सध्या सहाय्यक संचालक नगररचना असे पद आहे तथापि मध्यंतरी शासनाने उपसंचालक, नगररचना पद मंजुर केलेले असून अद्याप हे पद रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक शहराचा वाढता विस्तार आणि कामकाजाचा वाढता व्याप पाहता शहराकरिता नाशिक महानगरपालिकेत उपसंचालक नगररचना हे पद त्वरित भरण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नगररचना उपसंचालक पद भरण्यासाठी शासन स्तरावरुन धोरणात्मक निर्णय घेण्यात येणार काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-१०-२०१८) :** (१) नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेवर दिनांक २८/०९/२०१० च्या शासन निर्णयान्वये उप संचालक, नगर रचना हे पद मंजूर करण्यात आले आहे.सदर पद नगर रचना संचालनालयातील सहायक संचालक, नगर रचना या पदाच्या समकक्ष वेतनश्रेणीतील आहे.
(२) नाशिक महानगरपालिकामध्ये सहायक संचालक, नगर रचना हे शासकीय आस्थापनेवरील एक पद मंजूर असून सदरहू पदावर सहायक संचालक, नगर रचना पदावरील अधिकाऱ्यांची दिनांक २२/०६/२०१८ पासून नियुक्ती करण्यात आली आहे.
(३) व (४) नाशिक महानगरपालिकेमधील नगर रचना विभागातील उप संचालक, नगर रचना हे पद नगर रचना संचालनालयाच्या आस्थापनेवरील उप संचालक पदाच्या वेतनश्रेणीत आणण्याबाबत तसेच सदर पद नगर रचना संचालनालयाच्या उप संचालक दर्जाच्या अधिकाऱ्यामधून प्रतिनियुक्तीने भरण्याकरिता सेवा प्रवेश नियमात आवश्यक ती सुधारणा झाल्यानंतर पदभरती बाबतची कार्यवाही करण्यात येईल.

---

**कणकवली शहरात (ता.कणकवली जि.सिंधुदुर्ग) विकासकाने अग्निशमक विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र न घेता बांधकाम केल्याबाबत**

**(५०) १२५४३७ (३०-०७-२०१८). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कणकवली शहरात (ता.कणकवली जि.सिंधुदुर्ग) डीपी रोड नजीक सर्व्हे नंबर ३४२५, ३४२४, ३५९६ मध्ये विकासक श्री गणेश सोनू हर्णे यांनी तळमजला, पहिला मजला, दुसरा मजला असे एकूण १२८४.३६ चौ.मी बांधकाम करुन देखील अग्निशमक विभागाकडून ना हरकत दाखला किंवा पुर्वपरवानगी घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय महामार्गालगत सर्व्हे नं २०७/४३ ब, सर्व्हे नं २०७ ब १३, स.नं २०४ व १० मध्ये विकासक श्री रामचंद्र उचले व इतर यांनी बांधकाम करतांना व जोडरस्त्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची कोणतीही परवागनी घेतलेली नसून रस्त्याच्या मध्यापासून ३७ मीटरच्या आत वाणिज्य प्रकारचे बांधकाम करुन पथकिनारवर नियमांचा भंग केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एखादया इमारतीमध्ये वाणिज्य प्रकारचे एकूण बांधकाम हे ५०० चौ.मी पेक्षा जास्त असेल तर नगरपालिका विकास नियंत्रण नियमावलीचे कलम ६.६.२ नुसार नियम क्रमांक ६.२.६.१ अन्वये मान्य होऊ शकणा-या बांधकाम प्रस्तावासाठी मुख्य अग्निशमक अधिकारी यांनी तो प्रस्ताव तपासला पाहिजे व त्यांनी ना हरकत पत्र दिल्यानंतर मुख्याधिकारी यांनी इमारत परवाना द्यावयाचा असतांना संबंधित विकासकाने एकूण १४७०.४० चौ.मी वाणिज्य प्रकारचे बांधकाम करुन देखील अग्निशमक विभागाकडून ना हरकत दाखल किवा पूर्वपरवानगी घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित विकासकाने मुख्य अग्निशामक अधिकारी यांचेकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त केलेले नसल्यामुळे नगरपालिका विकास नियंत्रण नियमावलीचे कलम ६.६.२ नुसार मुख्याधिकारी कणकवली यांनी दिलेली बांधकाम परवानगी ही अनधिकृत व नियमबाहय ठरते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर इमारतींसाठी संबंधित विकासकांनी अग्निशमक विभाग तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांचेकडून परवागनी घेतलेली नसल्यामुळे सदर इमारतीला दिलेली बांधकाम परवानगी व भोगवटा प्रमाणपत्र रदद करुन संबंधित विकासकाने केलेले अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यासंदर्भात श्री.प्रशांत एकनाथ लाड यांनी जून, २०१८ मध्ये जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचेकडे तक्रार केली होती, हे ही खेर आहे काय,

(६) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित अनधिकृत बांधकामाबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१८) :** (१) सदर इमारत ही विशेष इमारत (शासकीय किंवा शैक्षणिक इमारत इ.) नसून वाणिज्य आणि रहिवास अशी मिश्र व सर्वसाधारण प्रकारची इमारत असल्याने विकासकाने अग्निशमन विभागाचा ना-हरकत दाखला नगरपरिषदेस सादर केला नाही, असे नगरपरिषदेने कळविले आहे.

(२) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार आवश्यक असलेले विहित अंतर सोडले असल्याने पथकिनारा नियमाचा भंग झालेला नाही, असे नगरपरिषदेने कळविले आहे.

(३) व (४) नगरपालिका विकास नियंत्रण नियमावली कलम, ६.६.२ हे विशेष इमारतीकरीता लागू होत असून उक्त प्रकरणातील इमारत मिश्र स्वरुपाची असल्याने, देण्यात आलेली बांधकाम परवानगी अनधिकृत व नियमबाह्य ठरत नाही, असे जिल्हा प्रशासन अधिकारी, सिंधुदुर्ग यांनी कळविले आहे.

(५) व (६) अशा आशयाची तक्रार जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्याकडे प्राप्त झाली आहे, असे जिल्हा प्रशासन अधिकारी, सिंधुदुर्ग यांनी कळविले आहे.

• सदर तक्रारीच्या अनुषंगाने या प्रकरणी झालेले बांधकाम विहित नियम व शासनाच्या प्रचलित तांत्रिक अटी व शर्ती यांच्या अधिन राहून केल्याचे खातरजमा करुन नियमानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना देण्यात आल्या आहेत.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.